
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७७८



# गीत सौभद्र

ग. दि. माडगूळकर

REFBK-0016969

# गीत सौभद्र

१६९६८

REFBK-0016969

REFBK-0016969

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

अनुक्रम ६०००३ दि: ७।०५

१७७८ १५।१९७९

# गीत सौभद्र

ग. दि. माडगूळकर

सो मै या प ब्लि के श न्स प्रा. लि.

© ग. दि. माडगूळकर

प्रथमावृत्ति : डिसेंबर १९६८

चित्रकार : सुरेन्द्र सिरसाट

मुद्रक : स. ना. तवकर
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. ( मुद्रणालय ),
वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुंबई ३१.

प्रकाशक : कृ. श. सामंत
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.,
१७२ नायगाव क्रॉस रस्ता, दादर, मुंबई १४.

मूल्य : रुपये पाच

# प्रास्ताविक

ग. दि. माडगूळकरांच्या 'गीत सौभद्राला' प्रस्तावना लिहिताना मला एका प्रसंगाची आठवण झाली. लग्नाचा मांडव सजला होता. आप्तेष्ट मंडळीं, विशेषतः स्त्रीसमुदाय इकडून तिकडे घोटाळत होता. एक गृहस्थ मात्र कोपऱ्यात न उलगडलेल्या जाजमाच्या वळकटीवर स्वस्थ बसून होते. काही वेळाने कुणी न सांगता सवरता तिथून उठले आणि कोकणीत 'पिसोंडी' म्हणतात तसली छोटी झाडणी घेऊन बोहले झाडायला लागले. कुणाचेसे लक्ष त्या गृहस्थांकडे गेले.

"अहो, अहो हे काय ? आपण कशाला झाडताय ?"

"अहो माझ्या हातून कसलं झाडून होणार आहे ? पुन्हा तुमच्यापैकी कुणाला तरी ते नीट झाडावेच लागणार आहे. पण शुभकार्य आहे. आपलाही हात लागला पाहिजे म्हणून जरासा लागलो कामाला."

सुभद्रेच्या लग्नाची कथा अण्णा किर्लोस्करांनी 'सौभद्र' नाटकात सांगितली. अण्णा माडगूळकरांनी त्यांतल्या गद्याचीही गीते केली आणि सौभद्राचे 'गीतसौभद्र' केले. 'ललितकलादर्श' नाटक मंडळीने ते रंगभूमीवरही आणले. आता ते ग्रंथातून वाचकांपुढे येत आहे. माझी भूमिका वास्तविक पाहता गर्दीतल्या प्रेक्षकाची. पण कार्य शुभ आहे. नव्हे, घरचे आहे या भावनेने हात लावीत आहे. एरवी किर्लोस्कर, माडगूळकर आणि 'सौभद्र' हे तिन्ही चमत्कार प्रस्तावनेच्या उपचारापलीकडले आहेत. 'चमत्कार' हा शब्द मी मनापासून वापरला आहे. गीतकार माडगूळकर हा मला 'सौभद्र' नाटकासारखाच एक चमत्कार वाटतो. 'सहज बोलणे तरी उपदेश' असे संतांविषयी म्हणतात. माडगूळकरांची गीतरचना सहजपणाची ती उंची गाठते. सोपेपणाइतके जगात अवघड

काहीही नाही. इसापाच्या गोष्टी वाचायला किती सोप्या. रचायला किती अवघड. माडगूळकरांची गीते या अर्थानेच सोपी. म्हणूनच ग. दि. माडगूळकर हे नाव आज मराठी मुलखात पुरणपोळीइतके लोकप्रिय आहे. त्या पक्वान्नासारखेच मराठी गरीबापासून मराठी श्रीमंताइतके सर्वोमुखी आवडीने नांदणारे आणि संपूर्ण स्वदेशी !

एकनाथाप्रमाणे माडगूळकर हा सर्व पेठांचा कवी. भागवतापासून भारूडापर्यंत नानापरींच्या गीतांचा तो एक जसा जनक होता तसेच माडगूळकर. तमाशाच्या बोर्डावर माडगूळकरांची लावणी छुमछुमत असते. देवळातल्या कीर्तनात त्यांचा अभंग रंगलेला असतो. एखादी नात आजीला गीत रामायण ऐकवीत असते. एखाद्या विजनात तरुतळी एक वही कवितेची घेऊन प्रियकराच्या कानी गाणे गुणगुणारी युवती माडगूळकरांचे गीत गात असते आणि सीमेवरचे जवान त्यांच्या समरगीताच्या धुंदीत पावले टाकीत असतात. कवीच्या हयातीतच त्या गीतांपैकी अनेक गीतांना अपौरुषेयत्व लाभले माडगूळकरांच्या कढत लावणीचा चटका बसलेले एक गृहस्थ चिडून मला म्हणाले होते की, “माडगूळकरांनी असल्या फक्त लावण्याच लिहाव्यात ! मी सांगतो – ‘वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदेमातरम्’ सारखी एक ओळ माडगूळकरांना लिहिता येणार नाही. असल्या तेजस्वी कवीकडे जाऊन शिका म्हणावं !”

“ते शक्य नाही” मी म्हणालो.

“का ?”

“कारण ‘वेदमंत्राहून आम्हा’ हे गीतसुद्धा ग. दि. माडगूळकरांचंच आहे.”

संतशाहिरांनंतर असले नामातीत होण्याचे भाग्य एवढ्या मोठ्या प्रमाणात लाभलेला कवी माझ्या पाहाण्यात नाही. सामान्य आणि असामान्य दोन्ही प्रतीच्या रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळालेला हा कवी आहे. क्वचित एखादा केवळ शब्दज्ञानी समीक्षक त्यांच्या या असामान्य प्रतिभेची कुचेष्टा करतो. अवहेलना करतो. त्यांचा जाणूनबुजून अपमानही करतो. त्यातून माडगूळकर हे सिनेमाची गाणी लिहिणारे ! बरं पुन्हा अत्यंत यशस्वी. ‘धनं धान्यं पशुं बहुपुत्रलाभम्’ हा ऋषींचा आशीर्वाद ज्यांच्या जीवनात खरा ठरला आणि ज्यांच्या कवितेने माणसे तृप्त होऊन ‘शतं जीव’ असे आपण होऊन म्हणतात असे कलावंत. कवी तर खरेच. शिवाय उत्तम–म्हणजे अतिशय उत्तम नट ! कथालेखक. वक्ते. मानाची अनेक पाने मिळविलेले. बोद्धारांना मत्सरग्रस्त व्हायला दुसऱ्याच्या यशाचा एवढासा दाणा पुरतो. इथे तर यशाच्या भरघोस कणसांचा मळा फुलला आहे. त्याला असले कुत्सित टीकेचे एखादे गालबोट लावणारा

त्या यशाची शोभा वाढवीत असतो. पण ज्यांच्या जीवनात माडगूळकरांची गीते जाऊन मिसळली, त्यांच्या प्रासादिक वाणीतून ज्यांना जीवनात शहाणपण लाभल्यासारखे वाटले, धीर आला, मौज वाटली, आनंदाचे उमाळे आले त्यांच्या लेखी महाराष्ट्रात आज 'कवी म्हणजे माडगूळकर' हेच समीकरण आहे. इतकी संगीत नाटके झाली आणि होताहेत पण सौभद्राचा ताजेपणा कमी होत नाही. तीच गोष्ट माडगूळकरांच्या गीतांची आहे. त्यांचे गीत रामायण ऐकणाऱ्या श्रोत्यांना तर ह्या कवीला आणि गायक सुधीर फडक्यांना कुठे ठेवू आणि कुठे नको असे होऊन गेले आहे. माडगूळकरांच्या 'हलो हलोला हल्कट उत्तर' मिळत नाही. त्यांना प्रतिसाद मिळतो तो 'पुंडलिकवरदा' म्हटल्यावर हजारोंच्या मुखांतून 'हाऽऽरि विठ्ठऽऽल' उमटते तसा! आईने दुधा-बरोबर ओवी पाजून वाढविलेला हा कवी आहे. आता उमलतात ती त्या शुद्ध देशी संस्काराची फुले.

शेवटी पिंडावर जे संस्कार नियतीने आणि कधी कधी स्वतःच्या बुद्धीने होतात त्यातूनच माणूस प्रकटत असतो. माडगूळकरांचे बालपण जात्यावरच्या ओव्यांत आणि कथा कीर्तनाच्या रंगात रंगले. रामायण आणि महाभारत या भारतीय संस्कृतीच्या गगायमुनांच्या काठी खेळण्याचे भाग्य त्यांना बालपणापासून लाभले. आमची देवळे हीच मुख्य सांस्कृतिक केंद्रे होती. आमची संस्कृती देवळांशी फटकून बाहेर पडली नव्हती. माडगूळकरांचे सांस्कृतिक शिक्षण या देवळातूनच टाळ–मृदंग–वीणेच्या घण-घणाटाने सुरू होणाऱ्या शाळेत झाले. ज्या मातीतून पोषणाची द्रव्ये घेऊन रोपे वर येतात त्या मातीचे नाते कृत्रिम रीतीने तोडता येत नाही. नाते तोडण्याच्या घोषणा केल्या म्हणून नाते तुटले म्हणता येत नाही. आधुनिक मराठी साहित्यात हा असा नाते तोडण्याचा विचार सुरू झाला आहे. परवाच एका मासिकात एका नव विद्वानाने 'रामायण आणि महाभारताच्या myths तोडून मोडून फेकून दिल्या पाहिजेत' असे विधान केलेले मी वाचले. धनुर्भंग मी ऐकला आहे. इंद्रधनुर्भंग ऐकला नव्हता. रामायण आणि महाभारत ही भारतीयाच्या हृदयाकाशावर उमटणारी इंद्रधनुष्ये आहेत. व्यास–वाल्मिकींच्या अलौकिक प्रतिभेचे किरण ज्यांच्या मेघांसारख्या सुंदर भावनांनी भरलेल्या आर्द्र अंतःकरणावर पडतात तिथेच ही इंद्रधनुष्ये उभी राहातात. शतकानुशतके उभी राहिली आहेत. द्वेषाच्या झापडांनी मनाची आणि बुद्धीची कवाडे बंद केली तर किरण शिरणारच कसे? व्यासवाल्मिकींच्या प्रतिभेविषयी बेतालपणाने बरळणाऱ्याला घाणेरड्या अंधारकोठडीत नांदण्याची ओढ लागली आहे या परते आणखी काय म्हणावे?

महाकवींनी दिलेले हे भांडार आम्ही भारतीय शतकानुशतके लुटत आलो. परचक्रे आली आणि गेली. साम्राज्यांचे सूर्यचंद्र उगवले मावळले. पण या देशावर राम-कृष्णांचे अधिराज्य चालूच आहे. त्यांच्या लीलांनी हिंदू तर रंगले पण मुसलमानही रंगले. इतकेच कशाला ? महाभारताच्या मध्यभागी असलेली गीता वॉरन् हेस्टिंग्ज्ने समजावून घेतली आणि म्हणाला, भारतीयांच्या अंतःकरणाची ओळख हवी असेल तर गीता समजून घ्या. दुर्दैव इतकेच कृष्णाचा कर्मयोग त्या साहेबाने आचरला. आमच्या मनापुढे अकीर्तिकर कश्मले उभी राहिली. तरीही प्रत्येक विषयात आम्ही आधार शोधीत जातो तो या महाकाव्यांचाच. आमच्या जनसाधारणाच्या भेदरलेल्या मनांना धीर दिला तो रामायण महाभारतांतल्या कथांनी. संकटात या कथा मेरू होऊन मागे उभ्या राहतात. सुखाच्या क्षणी देवतरूंची सुगंधी पुष्पे होतात. आमच्या श्रृंगाराला रंग आणतात. औदासिन्यात आनंद होऊन येतात. वैराग्यात मुक्तीचे मार्ग उजळणारे दीप होतात. राष्ट्रीय पतनाच्या क्षणी अभ्युदयाचे संजीवक मंत्र होतात. प्रापंचिक अड-चणीत स्नेहाचे हात होतात. अनंत लीलावतारी परमेश्वरासारख्या या अनंत लीलावतारी कथा. भक्तांनी एकतारीवर आळवलेल्या, तत्त्वज्ञांनी गायिलेल्या. डॉ. लोहिया म्हणाले होते, " माझ्या भारतात लोक तत्त्वज्ञान वाचत नसतात – गात असतात. " आमचे संत हे गाणारे तत्त्वज्ञ. जिथे तत्त्वज्ञानाची अवघड साधना देखील आम्ही सुरांच्या संगतीने केली तिथे काव्याची गाण्यातून फारकत करायची म्हणजे फुलांची सुगंधातून फारकत करण्यापैकी आहे. गंधहीन फुले असतात म्हणून सुगंधाची फुलांना अडचण होते असे आपण मानायचे की काय ? कागदावरचे मुद्रण ही सोय आहे. पण उच्चार हा शब्दांचा मूळधर्म आहे. कवितेला कागदातच गुंडाळून ठेवणे म्हणजे शब्दांचा गळा आवळणे आहे. कविता गेय आहे हे कवितेचे दूषण ठरावे हे दुर्दैव आहे. आज छापखाना नैसर्गिक आणि गाता जिवंत गळा अनैसर्गिक ठरला आहे. जातिवृत्तांचे कवितेला ओझे वाटू लागले आहे. आणि म्हणूनच कविता रसिकांच्या रंध्रारंध्रातून झिरपत न जाता, त्यांच्या मनात कायमची न मुरता कागदोपत्री जमा होत आहे. पाठांतर हे खिशात खुळखुळणाऱ्या रोकडीसारखे आहे. आपल्या श्वासाइतके ते आपले स्वतःचे असते. स्वरलहरी आणि शब्द यांचा घटस्फोट झालेल्या या आधुनिक काळात सनातन युगुलाला एकत्र नांदवणारे अण्णा किर्लोस्कर आणि अण्णा माडगूळकर वास्तविक उपेक्षेच्या अंधारात पडायला हवेत. लोकांना सुदृढ प्रकृतिमार्गापेक्षा रोगट विकृतिमार्गाची ओढ अधिक लागलेली दिसायला हवी. पण चमत्कार असा की मरून पन्नास वर्षे ओलांडलेले

किर्लोस्कर अण्णाही आज तितकेच लोकप्रिय आणि जन्माला येऊन ज्यांना अजून पुरती पन्नास वर्षे झाली नाहीत असे त्याच कविवंशातले प्रतिभासदृश माडगूळकर अण्णाही तितकेच लोकप्रिय. काव्यात गेयतेचे कूळ सोडायला माझा देश तयार नाही. ते कूळ का सोडावे हे त्याला कळत नाही. इंग्रजी कविता आम्ही गद्यासारख्या वाचायला लागलो. एरवी गायनाचा दर्जा कसलाही असो आमचा कवी कविता वेड्यावाकुड्या का होईना पण गातच असे.

रामायण—महाभारतातल्या कथांची गीते करून आपण भारतीय देशभर गातच आलो. नाटक देखील गाणारे होते. आमचा महान नाटककार हा नाट्यकुलगुरू नव्हे, 'कवि'कुलगुरू. रामायण महाभारतातल्या प्रसंगावरची शेकडो नाटके—आमच्या जानपद-जीवनात गात गात काळावर मात करीत आली आहेत. अण्णा किर्लोस्करांचे 'सौभद्र' असेच गात आले. त्यातल्या गद्यसंवादांना माडगूळकरांनी पद्यस्वरूप दिले. जादूगाराने आपली जादूची कांडी लावावी तसा माडगूळकरांच्या प्रतिभेचा स्पर्श त्या गद्य शब्दांना झाल्यावर त्यांतून गीतांची फुलपाखरे उडाली. माडगूळकरांचे घराणे किर्लोस्कर—देवलांचेच. त्यांनी आपला 'चैत्रबन' हा गीतसंग्रह याच दोन कवींच्या प्रतिभेला अर्पण केला आहे. माडगूळकरांची प्रतिभा त्या दोघींची तिसरी बहीण म्हणून उभे राहाण्याच्या योग्यतेचीच नव्हे तर धाकटी असून ही काहीशी अधिक चतुर आणि गोमटी आहे.

ऑपेरा या पाश्चात्य संगीत नाटकावरून आपण आपल्या संगीत नाटकाची उभारणी केली असे विधान चांगल्या चांगल्या विद्वानांनी केले आहे. हे म्हणजे आमच्या भारतीय स्त्रियांनी कपाळावरचे कुंकू मडमांच्या ओठावरच्या लिपस्टिकवरून घेतले आहे असे म्हणण्याइतके शहाणपणाचे आहे. आमच्या देशात नाटक हे काव्यच होते आणि काव्य हे गेयच होते. जानपद भारतापासून तुटलेल्या आंग्लभारतीयांना आपल्या सुंदर परंपरांचा विसर पडल्याच्या अनेक उदाहरणांतले हे एक उदाहरण. आमच्या देशात संघगायन नाही म्हणणाऱ्या आंग्लभारतीयांना टाळ-मृदंग-वीणेच्या नादात तहानभूक हरपून शेकडो मैलांची वाट तुडविणारे वारकऱ्यांचे आणि वैष्णवांचे मेळे दिसत नाहीत. आमच्या स्त्रियांनी पुरुषांच्या जोडीने काम करायला हवे म्हणणाऱ्यांना आमच्या शेतमळ्यांतून राबणारे लाखो स्त्रियांचे श्रमिक हात दिसत नाहीत. आमच्या साऱ्या जीवनाची ही परवड आहे. आमच्या जीवनातली सत्ये आम्ही पश्चिमेकडून परावर्तित होणाऱ्या उजेडातच पाहू शकतो. आज आमच्या देशात उत्तरेला नवटंकी आहे, पूर्वेला जात्रा आहे, पश्चिमेला भवई आहे, दक्षिणेला यक्षगान आहे. संगीत नाटकांचे हे प्रयोग शतकानुशतके

चालू आहेत. 'गीतसौभद्र' हा त्या परंपरेत बसणारा नाट्यप्रकार आहे. आज युक्त प्रांतात महाभारत, रामायण किंवा इतिहासातल्या वीरगाथांवर आधारलेल्या नवटंकीचे प्रयोग खेडोपाडी चालू आहेत. या कलावंतांचे गायन आणि अभिनय यांचे दर्शन मला घडले आहे. रात्री नवाला उभी राहाणारी नवटंकी पहाटे एखादी चोंबडी कोंबडी आरवते तेव्हा संपते. आठ आठ रात्री माणसे राम–कृष्ण किंवा पृथ्वीराज–अमरसिंग यांच्या जीवननाट्यात रंगलेली असतात. नाटक आठवडाभर रंगते. या नाटकातल्या गीतांची रचना करणे अतिशय बिकट असते. कारण ती गीते सोपी असावी लागतात. आधुनिक कवितेप्रमाणे अर्थाच्या प्रसूतीसाठी तिथे समीक्षक नामक सुईण नसते, या हृदयीचे त्या हृदयी सरळ ओतावे लागते. मोकळ्या मैदानात जमणाऱ्या श्रोत्यांच्या कानी तीरासारखे सूर नेऊन पोहोचवणारे आवाजदार नट आणि नटी आजही या देशात आहेत.

असल्या सोप्या शब्दांतून अर्थाची गहन बीजे फुलवणाऱ्या प्रतिभेची माडगूळकरांना तर देणगीच आहे. किर्लोस्कर–देवलांची भाषाही अशीच लडिवाळपणे खेळणारी. ही देणगी दुर्दैवाने श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना नव्हती. त्यांच्या शब्दांचे वळण संतांच्या जातीचे नव्हते. पंडिती वळणाची त्यांची रचना. कोल्हटकरांच्या आमदानीत अभिजात संगीतकारांचा नाटक मंडळ्यांत राबता सुरू झाला. शब्दांप्रमाणे संगीतानेही चाल नागमोडी केली. काव्यरचनेतल्या प्रसादाप्रमाणे संगीत रचनेतलाही प्रसाद लोपला. खाडिलकरांच्या गाण्यांना बालगंधर्वांचा अलौकिक गळा लाभला. भास्करबुवा किंवा गोविंदराव टेंबे यांच्या-सारख्यांची स्वरसिद्धी लाभली म्हणून ती सुसह्य झाली. एरवी तुरळक अपवाद सोडले तर ही गाणी अभिनयानुकूल नव्हेत. ते शब्द पारदर्शक नव्हते. अर्थाला लिंपून टाकणारे ते शब्द! अगदीच निसा गमपप गम पसा करणे गाण्यात बरे दिसायचे नाही म्हणून मदविलसतनतगता केले इतकेच! असल्या गाण्यांनी नाटकातल्या गाण्यांचे संवादस्वरूप नाहीसे केले. संवाद गेला म्हणून अभिनय गेला आणि नाट्यसंगीत ही केवळ उभ्याने गायलेली मराठी चीजांची मैफल झाली. नाटक बिचारे ओशाळून उभे राहिले.

आज गीतसौभद्राच्या रूपाने गायक नटनटींपुढे नवी संधी आली आहे. गायनावर विचारपूर्वक नियंत्रण आणले आणि स्वरशब्दांची ही फुले अभिनयाच्या सूत्रात नीट गुंफली तर रसिक ही कृती आनंदाने कंठी धारण करतील. बोलक्या शब्दांत गाणे लिहिणे ही माडगूळकरांच्या प्रतिभेची सहजलीला आहे. त्यांनी आजवर सहस्रावधी गीते लिहिली ती हितगुजाच्या भाषेत. हा कवी गाणे लिहीत नाही. गाणे बोलतो. नाटकही बोलके असावे लागते. मग ते गद्य असो की पद्य. गद्य संवाददेखील सूत्रबद्ध असावे लागतात. शब्द

हल्ला तर संवादातला चिरा ढासळल्यासारखा वाटला पाहिजे. गीत तर असल्या चिरेबंदी-शिवाय उभेच राहू शकत नाही. म्हणूनच गीत हे शिल्पाला अधिक जवळचे. प्राचीन शिल्पांचे भंगलेले अवयव साधण्याचा प्रयत्न केलेला मी काही लेण्यांतून पाहिला आहे. लाखात एखादा बेजोड सांधा दिसतो. कितीही सफाई केली तरी तोल बिघडतोच. कारण तो प्राचीन शिल्पकार आणि आधुनिक शिल्पकार यांना झालेल्या मूळ दर्शनातच कुठे तरी फरक पडलेला असावा. कुठेतरी हातगुणात तफावत पडते. किर्लोस्कर–माडगूळकरांच्या प्रतिभेचे कूळ एक असल्यामुळे इथे वडाची साल पिंपळाला लागली नाही. हे दोन प्रति-भांचे दोन ज्योतींसारखे मीलन आहे. या मीलनाचा आनंद पुस्तकाच्या आधारापेक्षा रंगमंचावरून अधिक मिळेल. जिद्दीच्या गायक कलावंतांनी हे प्रयोग केले तर अर्जुन-सुभद्रेच्या प्रणयपूर्तीची ही संपूर्ण गीतालंकारांनी नटलेली नाट्यकथा रसिकांना सदैव रंजवीत राहील. माडगूळकरांच्या प्रासादिक वाणीइतकी ज्यांची गायन आणि अभिनयकला निर्मळ आणि प्रासादिक आहे अशा नटांसाठी या तबकात ही फुले आहेत. माझे काम तबकावरचा जाळीदार रुमाल उचलणाऱ्या सेवकाचे होते. हे कार्य मी आनंदाने केले आहे. कारण कार्य किर्लोस्कर–माडगूळकरांचे आहे तेव्हा कार्य शुभ आहे आणि घरचे आहे.

पु. ल. देशपांडे

मुंबई
वर्षप्रतिपदा
२९ मार्च १९६८.

६०००३ ८।०२५
१७७८ १५-१-६९

*तिरप्या अक्षरातील पद्यरचना कै. बळवन्त पांडुरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या मूळ ' संगीत सौभद्र ' नाटकातील आहे.*



नारद : हा उपाय बरवा, अमान्य मजही नाहीं
संन्यास त्रिदंडी घेउनिया तूं राही
प्रारब्धगतीने मनासारखे घडता
तुज पुनः प्रपंची येता येईल पार्था

१६९६९

# अंक पहिला

सूत्रधार : नमुनि ईशचरणा । करित मग गजाननाच्या पादस्मरणा ॥ ध्रु ॥
सुकविरत्नमाला । अतिशोभा दे यदीय सुंदर वक्षाला ।
जिच्यामध्यें महामणी प्रकाश पाडित सुवर्णपदकीं बसोनिया
कालिदास राणा ॥

( नटी प्रवेश करते )

नटी : झाली ज्याची उपर दुहिता । चैन नसे त्या तापवी चिंता ॥ ध्रु ॥
केवि मिळे पति कुलीन सुंदर, लोकप्रिय धनवान जो ज्ञाता ॥१॥
सासु, श्वशुर, जावा, नणंदा, छळतिल किंवा करितिल ममता ॥२॥
सर्व मिळाले, लग्न लागले, तरिहि न लाभे मुळी स्वस्थता ॥३॥
सासरि मग काशी वागेल ही, काळजि निशिदिनिं पोळवी चित्ता ॥४॥

सूत्रधार : प्रिये, न सोडी धीर यापरी
कधी न कधितरी तुझी कन्यका होईल गे नवरी—
कन्येपूर्वी तिच्या पतीतें विधी निपजवितो भार्ये
ईशाज्ञेविण कांहीं न होती सृष्टीतिल ती कार्ये
म्हणूनी स्वस्थ रहा, विधिघटनेची वाट पहा…

नटी : वाट पहाती रसिक तयांची आशा आधी पुरवा

जमेल तेव्हा निजदुहितेचा विवाह नाथा, ठरवा
काय कुठें थटले ? वदा ना नाटक तरि कुठले ?

सूत्रधार : सौभद्रांचा प्रयोग आम्हि आज असे योजिला
सत्वर कर जा सर्व सिद्धता, साह्य करी मजला

नटी : आज्ञेआधी असे सिद्धता शुभारंभ व्हावा

सूत्रधार : तुझ्या मुखांतुन पहिला सुस्वर येथें उमटावा
त्याविन ना कांहीं, यायचे स्फुरण मला नाहीं
प्रथमदर्शनी ऐक सुंदरी, समययोग्य तूं गायना करी
ऋतु वसंत जो सुखवितो जना, तूं तयाचिया करि वर्णना.

नटी : *वैशाखमासिं वासंतिक समय शोभला*
*आम्रासव पिउनि गान करिति कोकिला*
*या जाईजुई मोगारिला बहर तो आला*
*गुंजारव करण्यांत गुंग मधुप जाहला*
*नवपल्लव ते फुटाति सकल वृक्षगणांला*
*कुसमगंधयुक्त मंद वात सूटला*

सूत्रधार : वर्णिलीस तूं स्वर्णद्वारका आज दिसे तैशी
राजगृहिं तर शुभ कोलाहल चाले दिवसनिशी
*झाली उपवर श्रीकृष्णाची भगिनी सुभद्रा तिजला*
*दुर्योधन भुपास हलधरे द्यावा निश्चय केला*
रोज रोज या नगरीमाजी नवे पाहुणे येती
निमंत्रणाविन जमति अतिथी त्यांची ना गणती
( दोघेही जातात. नारद प्रवेश करतात. )

नारद : *राधाधरमधुमिलिंद, जयजय रमारमण हरि गोविंद*
*कालिंदी–तट–पुलिंद–लांछित सुरनुतपादारविंद*
*उद्धृतनग मध्वरिंदमानघ सत्य पांडपटकुविंद*
*गोपसदनगुर्वेलिंदखेलन बलवत्स्तुतिते न निंद*
( अर्जुन प्रवेश करतो. )

अर्जुन : मुनिवर्या, मी मध्यम पांडव, पृथापुत्र अर्जुन
स्वीकारावे, विनम्र भावे, करितो अभिवादन

नारद : सुफलित होवो धनंजया, तव मनांतले इच्छित
एकटाच तूं कसा काय रे येसि इथे अवचित ?

अर्जुन : विसरलात की काय नारदा ?
पांच पांडवांसाठी केला, स्वयेच आपण नियम एकदा
त्या नियमाचे करण्या पालन
करितो आहे मी तीर्थाटन
दूर सारुनी नगर आप्तजन, दूर सारुनी सौख्यसंपदा.
पायीं पायीं प्रवास केला
उत्तर, दक्षिण, पूर्व दिशेला
नकळत वळतो पश्चिमेस तों मूर्त आपुली दिसली वरदा.

नारद : स्मरते रे मज पुरते स्मरते
अनुशासन मी केले होते
परंतु पार्था, कोण निमित्ते
पात्र होसि तूं या शिक्षेते ?

अर्जुन : इंद्रप्रस्थी असता, दिनभर कार्यात राहिलो दंग
शय्येवरती रात्रीं, थकल्या गात्रेच टाकिले अंग
अवचित मध्यान्हीला कानीं कर्कश्य ओरडा आला
उठलो शय्या त्यजुनी, विझलेला दीप तेवता केला
*चोरांनीं निज धेनु चोरिल्या धावा धावा ऐसे*
*शब्द करित ते ब्राह्मण आले माझ्या द्वारासरिसे*
*आश्वासुनि त्यांना । झालो तयार रिपुदमना . . .*
( नारदाच्या कानात काहीतरी सांगतो. )

नारद : ( मान डोलवितात. )
योगायोग म्हणावा, आणि चलावे पुढें पुढें पार्था

अर्जुन : आपण अनार्तदेशी आला होतात, ते कशाकरितां ?

नारद : *लग्नाला जातो मी द्वारकापुरा*
*देतो निज भगिनी राम कौरवेश्वरा*
*उत्सव बहु थोर होत, मिळतिल भूपाळ अमित*
*सुर, नर, मुनि सर्व येत, नट, नर्तक, सकल जमत*
*न मिळे अशि मौज पुनः पाहण्या नरा*

अर्जुन : ( दीर्घ निःश्वास सोडून. )
हुंः !

नारद : हंसलास कसा तू नाहीं ? शुभवार्ता ऐकुन कानीं ?

**भाग्याची पोर सुभद्रा, होईल उद्या सम्राज्ञी.**

अर्जुन : **भगवन्**

*मी कुमार तीही कुमारी असताना जागीं एका*
*वाढलो खेळलो प्रेमें प्रिय झालो एकामेकां*
*वरिल ती सुभद्रा मजला, हा निश्चय सर्वा लोकां*
*तैशांत रामकृष्णांनी*
*वडिलांचे मत घेवोनी*
*मज दिधली, ऐसे म्हणुनी*
*शेवट मग केला हा कां ?*
*जो प्रीतितरू वाढविला, त्यांनीच कसा तोडविला ?*

नारद : **सांगता सारे शुद्ध मनें**
**जळाने भरली तव नयने**
*पार्था, तुज देऊनि वचने*
*फसविले पहा मुकुंदाने*
*सार्वभौम दुर्योधननृपाति*
*लक्ष्मी त्याची आणुनि चित्ती*
*त्यजिले तुज अवमाने...*

अर्जून : *ज्यावरि मी विश्वास ठेविला, समजे प्राणप्रिय जो मजला*
*भजलो देवापरि मी ज्याला, तो ऐसा फिरला*
*योग्य मि नव्हतो तद्भगिनीला, द्यावी होती अन्य नृपाला*
*कैसा मम वैरी सन्मानीला, हे दुःखद मजला...*

नारद : **हरिचरिताचा, कृष्णमनाचा कुणा लागला थांग**
**तुजसाठी मी काय करू तें, मजसि अर्जुना सांग ?**

अर्जुन : **धर्म भीम या माझ्या ज्येष्ठा**
**निरोप सांगा उभय कनिष्ठा**
*नेमियले मज शत्रुजयाला, परि ते गेले सर्व लयाला*
*आहे भीमची की त्या कर्माला, बलसागर पहिला*
*होते जागीं भूषण जे याला, ते जाउनि निंदास्पद ठरला*
*तुमच्या सेवेला हा अंतरला, परलोकी गेला...*

नारद : **निरवानीरव कां रे ऐसी**
**निर्वाणीचे काय बोलसी ?**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
..६०००३........ दि: ...३१०५......
...२४७६......... १५-१-६९

मनि आणिसी काय योजना ?
सजसि तरि ती सांग अर्जुना

*अर्जुन* : धिःकार देव दैवा, धिःकार त्या विधात्या
विटलो पुरा पुरा मी, करणार आत्महत्या
आता जगूं कशाला ? मुख दाखवुं कुणाते ?
निर्लज्ज दुःस्थिती ही, सरणार प्राणघाते
श्रीकृष्ण घात साधी, जागा जगीं न सत्या

*नारद* : तुज क्षत्रिया न शोभे, हे भ्याड कृत्य पार्था
निःशस्त्र जीवहत्त्या, हे पाप रे समर्था !

*अर्जुन* : मज पापपुण्य याची उरली न चाड आता
धिःकारतो जगा मी, धिःकारतो विधाता

*नारद* : इहपरलोकी ठरो न बाधक उपाय ऐसा काढी
सर्व कुलाते करिल कलंकित, हट्ट असा हा सोडी

*अर्जुन* : मुने, मी घेतो संन्यासा
भगवी वसने धारण करुनी जातो वनवासां
जगात असूनी, जगी न राहिन
कंदमूळ फळ, पाने खाइन
हिमालयावर करिन निवासा अथवा शिवजैसा

*नारद* : हा उपाय बरवा, अमान्य मजही नाहीं
संन्यास त्रिदंडी घेउनिया तूं राही
प्रारब्धगतीने मनासारखे घडता
तुज पुनः प्रपंची येता येईल पार्था,
कधि कधि दैव-फळ मिळते बसल्या ठायीं
( पडद्यात )
ऐका हो, लक्ष्य द्या ऐका, ऐका हो राज्यसेवका
सेनानी सात्यकी यांची आज्ञा ही सर्व सैनिका
त्वरेने या, निघा सारे गिरी रैवतकातळीं
अरण्याभोवती वेढा, घालावा चहुबाजुंनी
चाळावी अवघी भूमी, शोधावे गिरिकंदरी
लाडकी रामकृष्णांची, द्वारकापुरपूजिता
नाहिशी जाहली आहे, सुभद्रा मंदिरातुनी

विवाहाची तिथी आहे, आजची धरली तिच्या
पणाला लागले आहे, बल-चातुर्य आपुले.

*अर्जुन* : ( स्वगत )
आजच होता विवाह आणिक आज हरवली नवरी
गड्या अर्जुना, अजुनी आहे वेळ तुझी रे बरी.
( उघड )
जगला आशातरू, नारदा
श्रावण लागे झरूं
वार्ता नच ही नवजलधारा
वठल्या वृक्षीं फुटवि अंकुरा
आतां कां मी मरू ?
मीही जातो, वनी शोधितो
दैवगतीचा खेळ पाहतो
भाग्यकाल हो सुरू
स्वप्नी मज ती रोज भेटते
पाहु पाहुसे मना वाटते
केवि कसा आवरू ...

*नारद* : जातोस तूं तरी जा,
ध्यानांत ठेव पार्था, उपदेश मात्र माझा.

*अर्जुन* : उपदेशासी तुमच्या ना मी विसरेन जन्मात

*नारद* : जा, जाऊन ये. मीहि पाहतो काय घडे उत्पात.

*अर्जुन* : चरणीं हा प्रणिपात

*नारद* : विजयी हो कार्यात
*पावना वामना या मना, दे तव भजनी निरंतर वासना*
*श्रीवत्सांकित कौस्तुभधारिन् योगिजनांतररंजना*
*भो प्रल्हादपरा हरिरूपा, मत्तनिशाचरकंदना*
*नवतुलसीदलमालाभूषा, बलवद्भवभयभंजना*
(नारद जातात.)
( मुर्च्छित सुभद्रेस घेऊन एक राक्षस प्रवेश करतो. अर्जुन एकीकडे जाऊन पहात उभा राहतो.)

*राक्षस* : ( स्वगत ) हरण करावे जिचे म्हणून मी बसलो होतो टपून

आजवरि परि अनंत विघ्ने ... गेलो पुरता थकून
आजच झाली वस्तु हस्तगत, धन्य जाहलो खरा
कुठे साठवु सुख हे आता, देह न पडतो पुरा
मोहिनीमंत्रे मोहित झाली, पुरती ही मोहिनी
पल्लवशय्येवरी निजवितो हिजसी मी उचलुनी
काढुनी घ्यावा मंत्र आपुला, आणि पुढे काय ?
गौरांगी ही जागृत होईल, करिल हाय हाय !
कोण सोडविल माझ्यापासुन, आतां येथे हिला ?
राहूसम हे माझे बाहू—ही तर चंद्रकला !
हळू हळू ही नयन उघडिते धुंद मद्यप्यापरी
सावध होता, घेइन हिज मी कवटाळुनिया उरीं.
(हळूहळू सुभद्रा भानावर येते. राक्षस तिच्याजवळ जातो. अर्जुन येतो आणि त्याला एकीकडे लोटतो. दोघांची झोंबाझोंबी होते आणि दोघेही झटापट करीत जातात.)

*सुभद्रा* : (पूर्ण जागी झाल्यावर)
अमळ मिटुन डोळे झोपले मी जराशी
बघुन निघुन गेल्या, काय या द्वाड दासी ?
कुठुन कशि इथे ही रास ये पल्लवांची ?
अजुन कशि दिसेना भिंत शय्यागृहाची ?
विरह व्यथित देहां गारवा अल्प यावा
म्हणुन कुणितरी हा यत्न केला असावा
उपवनि मज न्या ग, मीच होते म्हणाले
नकळत परि कैसी पुष्पकुंजांत आले ?
जवळ तरि असावे सेविकांनी सख्यांनी
दुरुन पण कुणाचे येति हे शब्द कानीं ?

*अर्जुन* : (पडद्याच्या आतून)
कुचलल्यावाचुनी तुजसि कां सोडितो
राक्षसी मांत्रिका, नरकी तुज धाडितो
साध्वितनु पीडीली, हात ते तोडितो
मंत्र उच्चारिला, तोंड ते फोडितो
करुन शकले तुझी, प्रेत लाथाडितो

व्याघ्रसिंहादिकें रानिंची श्वापदें
उदरिं त्यांच्या तुझा, देह हा जाउ दे
करुन हिंसा तुझी, पुण्य मी जोडितो—

*सुभद्रा* : धांव रे ईश्वरा, वार हे साकडें
मजवरी कां कुणी आप्तजन ओरडें ?
लग्नघटि पातली वाजती चौघडे
भास होतो मला की कुणी बोलले
कोणते पर्व हे, जीवनी चालले ?
धाव रे ईश्वरा, वार हे साकडें.
(अर्जुन येतो.)
चहूं बाजुनी कसा वेढिसी दुर्दैवा, तूं मला !
सुटुन जावया मार्ग न कोठे तिळभरहि राहिला
कुठली आशा धरुन जगावे, माझे मज ना कळे
कोणापाशी सांगूं हितगुज, बोलूं मनमोकळे ?
आप्त, बंधु, मी तुच्छ मानिले विसंबुनी ज्यावरी
ठावठिकाणा तरी तयाचा कोठे या भूवरी ?
*बलसागर तुम्हि वीरशिरोमणी कोठे तरि रमला*
*आश्वासन जिस दिले तिला कां विसरुनिया गेला ?*
*पेरियले जे प्रीतितरुचे बीज हृदयिं—त्याला—*
*अंकुर येउनि सुदृढ तयाचा वृक्ष असे झाला*
*सुंदर तुम्ही मूर्तिमान तच्छायेला बसला*
*चित्र असे हृदयांत कोंदता ठाव न अन्याला—*

*अर्जुन* : ( पुढे येऊन )
नांवच नाहीं काय सखे त्या चित्रांच्या प्रियकरा ?

*सुभद्रा* : *पांडुकुमारा पार्थ नरवरा राखा वचनाला*
*निश्चय माझा न ढळे जरि हा कंठ कुणी चिरला.*

*अर्जुन* : ( स्वगत )
गेल्या फिटून साऱ्या शंका खुळ्या मनाच्या
शिखरावरी उभा मी आनंद पर्वताच्या
मी साह्यभूत व्हावे हिज कोणत्या प्रकारें
ढकलुनिया दिले कीं मज माझिया विचारें

पडलो, समग्र बुडलो विषसागरी व्यथांच्या

*सुभद्रा* : ( वर आकाशाकडे पाहून )
अस्तास सूर्य गेला, काळोख झेप घेई
दासी, सख्या कुणीही माझ्या समीप नाहीं
ठरवून ठेवलेले, झाले न लग्न कैसे ?
अजुनी जिती सुभद्रा, टाकी कसे उसासे
गेले कुठे वऱ्हाडी, ते आप्त मित्र व्याही ?
सारंगलोचने ये, कुसुमावती कुठे ही ?

*अर्जुन* : हे सुंदरी कशाला, हांकारीसी कुणासी ?
येथें कुणी न तूंते देणार उत्तरासी.

*सुभद्रा* : ( भानावर येऊन, चिडून )
देतसां उत्तरा, कोण तुम्ही तरी ?
सोडिले कुणी तुम्हां आंत अंतःपुरी ?

*अर्जुन* : चारुगात्रि, मी केवळ यात्रिक
वनांत चुकलो मार्ग अचानक
निबिड दिसे हे रान भयप्रद
तशांत उठले गर्जत श्वापद
अटळ म्हणुन मी केली पारध
— तसा असे मी पूर्ण अहिंसक
जनावराशी जाउन भिडलो
निःशस्त्रचि मी त्यासी लढलो
वृक – रुधिराने सचैल न्हालो
— म्हणुन दिसे हा वेष भयानक

*सुभद्रा* : काय मी उभी घोर काननीं
या इथें मला आणिले कुणी ?

*अर्जुन* : शक्य ते कसे सांगणे मला ?
वदनचंद्र हा आज पाहिला

*सुभद्रा* : ( दुःखी )
कशि इथें एकटी राहूं, परतुन तरि कैसी जाऊ ?
देतील दूषणें मजला, भावजया आणिक भाऊ
म्हणतील पळुन ही गेली, साऱ्यांचे चुकवुन डोळे

बुडविले नांव वंशाचे, फासले मुखाला काळे
निष्कारण होइल निंदा, ती कशी कुठवरी साहूं ?
( मुर्च्छित होते. )

अर्जुन : ऊठ सुभद्रे, उघडी डोळे
जरा मजकडे पहा प्रेमळे
मुहूर्त तो तर मीच चुकविला
हेतु मनांतिल व्यर्थ लपविला
सुयोग जुळले होते सगळे
( सुभद्रा सावध होत नाही, यामुळे खिन्न होऊन )
हवे होते मी प्रगट व्हावयास
हिच्या भीतीचा करविण्या निरास
वृथा धरिला मी वांकडा आडरस्ता
सुखे दोघांनीं जायचे इंद्रप्रस्थां
( अजूनही सुभद्रा सावध झालेली नाही. )
प्रबळ मुर्च्छा ही ना सरे अजून
सखी निश्चेष्टा राहिली निजून
इथें कोठे कां सांपडेल पाणी ?
दिसत नाहीं माणूस कुठें कोणी
मलाच जाणे मग शेवटी
जलाशयाच्या शोधासाठी
कशि ठेवुं पण हिला एकटी ?
उपाय कांही नाहीं त्याला
हिच्या तनुवरि झाकुं शेला
या शेल्यावर हिनें एकदा
स्वये काढिला आहे कशिदा
कशिद्यावर त्या नांव विराजे
तिच्या प्रियाचे -- केवळ माझें.
हिनेच हा मज दिधला होता
द्वारकेत त्या आम्हि असता.
या शेल्याने हिला झाकतो
शोधुनिया जळ घेउन येतो

देवा नारायणा, करी या युक्तीच्या रक्षणा–
( अर्जुन जातो. पुनः तोच राक्षस प्रवेश करतो. )

*राक्षस* : श्रीकृष्णाची अगाध करणी कळली आहे कुणा
ज्याच्या त्याला अचूक पटती देवाघरच्या खुणा
कृष्णाज्ञेनें सुभद्रेस मी घेउन आलो वनीं
बतावणीही अचूक केली हरिस स्मरुनी मनी
देव म्हणाले तसेच घडले, चडफडला पाहुणा
कपटनाट्य ये आकारासी, शेवटची ही कडी
ही कृष्णाची रेशिमथैली, ही पत्राची घडी
थैलीमध्ये एकच वस्तू घालायाची नवी
तुझी सुभद्रे रत्नमालिका काढुन घ्याया हवी.
कथेंत पुढच्या प्रमुख भूमिका तुम्हां दोघाजणा ...
( राक्षस सुभद्रेला घेऊन जातो. उदकपात्र घेतलेला अर्जुन येतो. )

*अर्जुन* : ( सुभद्रा नाही असे पाहून )
लोपली सुभद्रा कोठे
या येथें होती निजली.
ही दिसते पल्लवराशी
घामांत तिच्या जी भिजली.
हे वृक्ष खुणेचे दोन
हलले न तयांचे पान
निःशब्द सभोती रान
सांजेची लालस शोभा, अजुनि ना पुरती विझली
कां सखी लाडकी माझी
व्याघ्राचे भक्ष जहाली ?
कीं त्याच राक्षसे तिजसी
येऊन ओढुनी नेली ?
गेलीस कुठे तूं बाले !
कांहींच कळेना झाले
सर्वस्व लयाला गेले
धिःकार असो जन्माला, वंचना घोर मी केली
*कांते, फार तुला मजसाठी श्रम सखये पडले*

*योग्य नसुनि मी प्रेमाला तव, व्यर्थ सखे मजवरि तें जडलें ॥ धृ ॥*
*जरि वरिला असता दुर्योधन, पाहिली तरि असती नेत्रांनीं*
*काय करूं, तुज शोधूं कोठे, धैर्य पहा सर्वहि ते खचलें.*

रडत बसलो यापरी जरि कितीही
अश्रु पुसण्या येणार कुणी नाहीं
धीर द्यावा मी, निश्चये स्वतःलागी
आणि न्यावे मजलाच योग्य मार्गी
( इकडे तिकडे फिरतो. थैली मिळते. ती उचलतो. )
ही तर दिसते तिचीच थैली
इथे कशी ही ऐसी पडली ?
पाप काय ही उघडुन बघता
अर्धांगिनी ती माझी कांता
( थैली उघडतो. )
तिचीच आहे रत्नमाळ ही
खेळत होती गळां प्रत्यही
मीच तिला ही दिधली होती
अशाच एका शारद रातीं
द्वारकेतला पुष्पकुंज तो
संवादांसह मजसी स्मरतो
( थैलीतील जिन्नस नीट निरखून पाहून )
पत्रहि आहे एक बरोबर
तिरपे तिरपे सुडौल अक्षर
मलाच उद्देशुन हे लिहिले
हृदय काय तूं सखे ओतिले ?
( पत्र वाचू लागतो. )
श्रीमत्सकलगुणैश्वर्यमंडित, मत्प्राणवल्लभ पांडुराजसुत
चरणकमलां असो प्रणिपात, मनोगतगीत अवधारा.
( खाली बसून वाचतो. )

*शशिकुलभूषण सदया, मत्प्राणेश्वर विजया*
*विनवी ही तव जाया, मान्य कराया.*
*आर्पिली ही काया, तवचरणीं पतिराया*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ६०००३ वि: काव्य
... ९७७६ क्रो: ... ९५-७
१२

*ठाउक असुनी हे सखया, त्यजिली का माया.*
*मज दुर्योधनाहाती द्याया निश्चय करिती*
*बंधू ते नायकिती, बघता अंत किती.*
*समयीं नाहीं आला, देइन मी प्राणाला*
*धाडियलीसे माला, खूण तुम्हांला.*
(आपल्याशी)
हे पत्र देउनी त्वरित धाडिला होता
कुणी दूत सखीनें माझ्या शोधाकरिता
ओळखीसाठिं ही दिधली होती माला
हा, विफल परंतु प्रयत्न अवघा झाला
वाटेत भेटला राक्षस, झाला घात !
अज्ञात राहिले तिचे मनोगत-गीत.
(पत्र पुढे वाचू लागतो.)
*रिपु नेता भार्येसी, सुचली यात्रा कैसी ?*
*याहुनि होउनि संन्यासी, न्या मज सेवेसी*
(दुःखातिशयाने)
हें पत्र नव्हे, गे तुझीच वाटे वाणी
ऐकता जाहले काळिज पाणी पाणी
अक्षरें जरी ही कठोर तरीहि आर्त
सुस्पष्ट उमगला मला आंतला अर्थ
सूचना मानतो, संन्यासाते घेतो
ध्यानास बैसण्या निघुन दूर मी जातो.
(काहीतरी आठवून थांबतो.)
संन्यास खरा, पण गौण त्रिदंडी घ्यावा
वचनास स्मरावे, मान नारदा द्यावा. (उठतो.)
प्रिया सुभद्रा घोर वनीं ह्या निशाचरें भेटविली
हेंचि कळेना गुप्त कशी ती एकाएकी झाली
मायावश केले, कीं मज स्वप्नचि हें पडलें ?
असो. कशाला विचार आतां. ठरलें जें तें ठरलें
मनि योजिले तसे करावे, गत्यंतर ना उरलें.
संन्यासाते घ्यावें, तपासी रैवतकी जावे.



विदूषक : मज थकवा आला अवघड चढणीमुळें
पोटांत लागले बोलाया कावळे
इतक्यात पाहिला झरा, हळू झुळझुळे
मज मोह जाहला, आवरले मन नाहीं
ते खाद्य माधवा, यतिस पोचले नाहीं

# अंक दुसरा

*श्रीकृष्ण : अर्जुन तर संन्यासी होऊनि रैवतकीं बसला*
*झाली सुभद्रा नष्ट असा ग्रह त्याच्या मनिं ठसला*
*वैराग्याचा पुतळा केवळ सांप्रत तो बनला.*
*ब्रह्मनिष्ठ वेदांती होउनी तुच्छ मानितो विषयाला*
*प्राणायामें कुंभक करुनी साधित योगाला*
*सुभद्रेची मूर्ती हृदयीं धरुनी करितसे ध्यानाला.*
*एक गोष्ट मज अनुकूलचि जाहली*
*कीं ढोंग नसुनि खरि वृत्ति यतिस साधली*
*नासिकाग्र दृष्टी सर्वकाल लागली.*
*भोळे अमुचे दादा तेथे जाति दर्शनाला*
*तरी खचित सांगतो तयाच्या लागति नादाला.*
यति राजाची बहुत प्रसिद्धी द्वारकेत व्हावी
दर्शन करण्या भक्तमंडळी रैवतकी जावी
कामगिरी मी म्हणुनी दिधली मित्राते एका
नगरीमाजी जाउन त्यानें पिटवावा डंका
अजुन कशी ती आली नाही भेटाया स्वारी

स्मरणासरशी उभे ठाकले ध्यानच हे दारीं
(विदूषकाला पाहून)
झोकदार हे काय चालणें, काय मुखाची रचना
वक्रतुंड हे नांव दिसतसे साजुन या ध्याना.
(विदूषक प्रवेश करतो.)

*विदूषक* : ('हुश्श' करुन, सुस्कारा टाकून)
या कपटपटूच्या कुणी न लागो नादी
श्रीकृष्ण कृपा ही जन्मभराची व्याधी ॥ ध्रु० ॥
नेमका कसा हा मलाच धरतो वेळीं
शतमूर्ख मीहि कां श्रमतो त्याच्यासाठीं ?
मज आज फिरविले त्यानें डोंगरपाठीं
त्या रैवतकाची चढण काय हो साधी ? ॥ १ ॥
मी ब्राह्मण कधिं ना सोडुन जातो आळी
मज हिंडवले पण यानें रानोमाळी
वर धाप लागली, मरावयाची पाळी
पायींचे उपानह तुटले, पाया आधीं ॥ २ ॥
तो यती लागतो काय मेहुणा याचा ?
कां उगाच मांडी बडेजाव हा त्याचा ?
कळवळा कशाला याला संन्यासाचा ?
मज म्हणे, 'तूंच जा महात्म्यास त्या शोधी.' ॥ ३ ॥
मज ठावठिकाणा सांगितला ना पुरता
पालथा घातला पर्वत त्याच्याकरिता
तो गुहेत एका मूक बैसला होता
मज बकध्यान ती गमली गाढ समाधी ॥ ४ ॥
इतिवृत्त तिकडचे सांगुनिया टाकावे
या जंजाळांतुन त्वरित मोकळे व्हावे
मग याच पावलीं, परत घरासी जावे
लागेल पाठिशि नातरि अन्य उपाधी ॥ ५ ॥
(उघडपणे कृष्णास)
कोपरापासुनी नमन द्वारकाधिशा
केलीस चांगली मित्राची दुर्दशा.

१७८८

*श्रीकृष्ण* : दुर्दशा ?

*विदूषक* : दुर्दशा म्हणजे कांहीं, वेगळे नसते गड्या,
दुखते अंग विप्राचे, पायाची होय चाळणी.
आसनी बैसुनी स्वस्थ, लोडासी रेलुनी जरा
देतोस मात्र तूं आज्ञा, बोलाया काय लागते ?

*श्रीकृष्ण* : मारिला वाघ कां तुम्ही, जिंकिला गढ कोणता ?
केलेत काय ते सांगा, पुढे विश्राम घ्या सुखे.
साजूक लावुनी तूप, चेपवू पाय आपुले
घांसवू कास्यपात्रानें, धन्य ही चरणें पुन्हा.
सोपविलेले काम सांग ना कुठवर कैसे आले ?
रैवतकावर तरुण यतीचे स्वागत कैसे झाले ?

*विदूषक* : ( भराभर सांगू लागतो. )
माझ्या आधीं, अर्धे द्वारका
जाइ बघाया तया साधका
नरनारीजन तशी अर्भके
यतीदर्शना येति कौतुकें
रीघ नुरावी मुंगीसाठीं
अशी विलक्षण झाली दाटी
कुणी मागती सुखसंपत्ती
कुणी याचिती पुत्र–संतती
कुणी सांगती शरीर व्याधी
कुणी मागती, मंत्र औषधी
कुणी वाहती फळे फळावळ
कुणी वाढवी पुढ्यांत श्रीफळ
कुणी घेतसे तीर्थ पदाचे
कुणी पूजती, कोणी गाती
लोटांगणही कुणी घालती.
खबदाडांतिल जुनी ओवरी
मंदिर जैसी दिसे साजरी
जिथे न जाइल कुणी एकटा
तिथें उमटल्या पाउलवाटा

भाविक-जन-यात्रा,
दाटली रैवतकीं मित्रा.

*श्रीकृष्ण* : (स्वगत)
जसे आंखले तसे घडतसे, सफल होतसे बुद्धी
नीट जाहला शुभारंभ तर, दूर नसावी सिद्धी.
(उघड)
आला नाहीं तोंवर झाला, ख्यातनाम हा यती
विस्मयकारक वाटतसे मज, मित्रा ही प्रगति
कसे काय हे असेल झाले, मला न कांही समजे
दर्शन मात्रे कशी जनांच्या मनांत भक्ती उपजे ?

*विदूषक* : समुदायाची संवय असे ही
एकामागे दुसरा जाई
माळावरती चरती मेंढरें
एकामागे जाते दुसरें
दुसऱ्या संगे तसेच तिसरे
विवेक नाहीं, विचार नाहीं
गर्तेमाजी पडता पुढचें
त्या गर्तेतच पडे मागचे
जे एकाचे, ते सर्वांचे
असेच घडते, जनांतरींही
कालचीच तुज कथितो घटना
तुझी तूच मग करी कल्पना
गर्गमुनींच्या रम्य आश्रमी
असेच बसलो होतो आम्ही
मुनी, शिष्यगण, ज्ञानी ब्राह्मण
चालू होत्या चर्चा, भाषण
मध्ये उठुनी उभे ठाकले
राजोपाध्ये गुरू आपले
भूत लागल्यापरि ओरडले
'अलभ्य ते मज सहज लाभले
असेच गर्जत गर्ग चालले

बघुन बाकीचे ब्राह्मण भ्याले
तेही निघाले त्यांच्या पाठी
नकळे कुठल्या लाभासाठी.

*श्रीकृष्ण* : सर्वच उठुनी चालु लागले?

*विदूषक* : सर्वच उठुनी चालु लागले
नवीन येउन त्यांस मिळाले
बघता बघता जमले शंभर
अवघे चढले रैवतकावर
यतिराजांच्या गुंफेजवळी
उभी ठाकली सर्व मंडळी
यतिराजांच्या पवित्र पायीं
गुरु गर्गांची झुकली डोयी
वाऱ्यासंगे गेली वार्ता
नगरीभरी हो बघता बघता
गर्गमुनीहि भजती ज्याला
असा पुरुष हा कोण प्रगटला!
म्हणुनी तयाला बघण्यासाठी
बघतकऱ्यांची पडली मिट्टी.

*श्रीकृष्ण* : वाहवा, वाहवा,
महायतीचे दर्शन घडले नकळत तुजला वेड्या,
यतीपरी त्या दिव्य विभूती जगांत असती थोड्या
फळे, मिठाई, मीही होती दिधली तुझियापाशी
आणलास ना प्रसाद संगे? सत्वर देई मजशी

*विदूषक* : ते खाद्य माधवा, यतिस पोचले नाहीं
सांगतो सर्व मी ऐकुन नुसते घेई
मज थकवा आला अवघड चढणीमुळें
पोटांत लागले बोलाया कावळे
इतक्यात पाहिला झरा, हळू झुळझुळे
मज मोह जाहला, आवरले मन नाहीं
छायाळ तरुचा करुन अडोसा उष्णा
नैवेद्य दाविला दुरुन यतीला कृष्णा

मी शांतविली रे, भूक आणि तृष्णा
वाचलो म्हणुन मी, मधेच चचलो नाहीं

*श्रीकृष्ण* : (हात जोडून)
सूर्त जठराग्नी आहेस महाभागा,
खाद्य वस्तूंना ऊदरींच तुझ्या जागा
तुझ्या हाती मी ठेविली फळे ती
हीच माझी अक्षम्य चूक होती.
दाविलासी नैवेद्य तूं यतीस
शेष त्यांच्यातिल का न आणिलेस ?
प्रसादासी तेवढे पुरे होते

*विदूषक* : शेष उरले टोपले मात्र, घे ते.

*श्रीकृष्ण* : सन्मित्राची थट्टा तुजशी आज बरी वाटे
एके दिवशी या थट्टेचे काढिन मी उट्टे.

*विदूषक* : जाउ दे गड्या तें, एक विचारिन म्हणतो
हा यती भामटा कोण तुझा लागतो ?
का खटाटोप तूं त्याच्यासाठी करिसी ?
हरि, सांग एकदां कारण याचे मजसी.

*श्रीकृष्ण* : निष्कारण कां पुसशी कारण उघड असे वेव्हार
विरक्त आहे महाभक्त तो ईश्वरीय अवतार
चिरकालास्तव द्वारकेत या त्यानें थांबावे
सदा सर्वदा दर्शन त्याचे तुला मला व्हावे.

*विदूषक* : श्रेष्ठपणा पण त्याचा तुजसी सांगीतला कोणी ?

*श्रीकृष्ण* : बोलले गुरुवर गर्गमुनी.

*विदूषक* : यँव्
अपराध्यांची कळली नांवें, आतां मागिन दाद
दादाजवळी जाउन ठोकिन, दोघांवर फिर्याद
(जाऊ लागतो.)

*श्रीकृष्ण* : अडणीवरच्या शंखा, का तू जासी दादाकडे ?
यतीराजांनी केले आहे काय तुझे वाकडे ?

*विदूषक* : वाकडे येइल जन्माचे
कसे पटावे सांग यापुढे अमुचे—अर्धांगीचे ?

१६९६९

नरनारीगण यती भोवती
त्यांत आमुची 'ही' पण होती
अश्शी घेउन दुरडी हाती
माझ्यादेखत यतिस देइ ती वायन नारिंगांचे
नमस्कार करि, बघे एकटक
मला न देई मुळीच ओळख
खुशाल कर तूं मित्रा, कौतुक
पाद्यपुजा मी करिन एकदा, फोडिन माथे यतिचे

*श्रीकृष्ण* : ( हसतो. )
यतीस पूजुन तुझ्या सतीने मागितले तरि काय ?

*विदूषक* : ( तिच्यासारखा स्वर काढीत. )
देखणा, शहाणा, सुदृढ सुंदर गोरा
मज हाच मिळावा, जन्मोजन्मी नवरा.

*श्रीकृष्ण* : तूं सुंदर तर विश्व आंधळे !
तूं सुदृढ तर आम्ही दुबळे ! !
( पुन: हसत राहतो. )
( वेत्रवती प्रवेश करते. )

*वेत्रवती* : घ्यावा नम्र प्रणाम
यदुवरा, आले श्री बलराम !

*श्रीकृष्ण* : जा वेत्रवती जा, सांग जाउनी त्यांना
आलोच म्हणावे आम्ही पद-दर्शना

*वेत्रवती* : भेटीस भगिनिच्या जाते आहे स्वारी
तिकडेच चलावे आपणही कंसारी
( जाते. )

*श्रीकृष्ण* : बरे, वक्रतुंडा, अनुज्ञेस देई
करी तूंहि विश्राम जाऊन गेही.

*विदूषक* : ( मान डोलावत जातो, पुन: परत फिरतो. )
कुठे तूप ते ?...कोण चोळील पाया ?

*श्रीकृष्ण* : उद्या सांगतो मल्ल मी पाठवाया ...

*विदूषक* : मल्ल ?

*श्रीकृष्ण* : (एकटाच, स्वतःशी)

गर्गगुरुंनी केली सीमा शिष्यरक्षणासाठीं
कितिहि रोखले तरी येतसे कृतज्ञता या ओठीं
गुरुसारखे नाही दैवत, शास्त्रवचन हे खरे
कुठल्या शब्दें स्तवन करु मी, भाषाबल ना पुरे.
*कोण तुजसम सांग मज गुरुराया, कैवारी सदया*
*पाहिजे ते अंगिकाराया, भवदुःख हराया*
*तूंचि विष्णु, तूंचि शिव, तूं धाता*
*तूं विश्वंभरता, तूंचि व्यापक व्यापाते प्रसविता*
*तूं मायेपरता*
*तूं शिष्या पोसणारी माता, तूं विद्यादाता*
*तूंचि देशी तत्वनिधी निज-हाता*
*तारक बलवंता.*
(जातो.)
(सुभद्रेचा महाल. श्रीकृष्ण व बलराम येतात.)

*बलराम* : सारंगलोचने, तूं गे कुसुमावती
कशि काय वाटते ताईची प्रकृती ?

*कुसुमावती* : लागते झोप, पण मधेच ये जागृती

*सारंगलोचना* : मधेच होती जाग्या आणिक पुसती आम्हाला
'रक्तमाखल्या वस्त्रांचा तो पुरुष कुठे गेला ?'

*श्रीकृष्ण* : संदर्भ कळेना, अर्थहि उमगे काही
बुद्धीच कुंठते, धागा लागत नाही.

*बलराम* : काय शोधिसी धागा कृष्णा, रहस्य आले हाती
अतर्क्य घटना अशा जीवनी सदैव येती, जाती.

*श्रीकृष्ण* : समजले जे तुम्हां, ते मला समजवा
व्यर्थ चिंता तरी चित्तीची शांतवा
गुप्त झाली कुठे, मुग्ध ही बालिका
फिरुन आली कशी, जखडली मंचका ?
अशुभसा शकुन हा, जाहला कौरवां

*बलराम* : *नाहि सुभद्रा या वार्तेते जेव्हां आयकिले*
*सर्वांगाची लाहि होउनि काळिज चरचरले*
*एकवार वाटे कीं क्रोधे तिनें प्राण दिधले*

*एकवार वाटे कीं तिजला पार्थानें नेले.*
*एकवार वाटे तूं तिजला कपटे लपवीले*
*ऐसे माझ्या मनांत नाना तरंग ते आले*
परत समजले, रत्न मिळाले, कोषागारी आले
एका एका शंकेचे मग निरसन माझ्या झाले
स्थिरावले मन, तरंग वरचे सर्वस्वी विरले
श्रीकृष्णाचे कपट तेवढे मागे होते उरले.

*श्रीकृष्ण* : अजुनी आहे उरले ... ?

*बलराम* : नाही, नाही, तेहि नाहिसे गर्गाचार्ये केलें

*श्रीकृष्ण* : पटुन जे मना सत्य वाटले
श्रीगुरु असे काय बोलले ?

*बलराम* : बोलले मला गर्ग सद्गुरु
यादवा, नको खंत तूं करू
अंतराळिंच्या यक्ष किन्नरी
खेल खेळती क्वचित यापरी.
ऐन लग्नि त्या अशाच नेती हरुनी नृपबाळा
मनांत त्यांच्या नसतो काही हेतु परि काळा
कधिकाळिंचा कोप तयांचा असतो कोणावरती
वधुपक्षिहि असती ऐशा व्यक्ती.

*श्रीकृष्ण* : सांप्रत होता कोप कुणावर ?

*बलराम* : सांप्रत त्यांच्या कोपा कारण दुर्योधन होता
यक्षकिन्नरी नव्हत्या अनुकुल कृष्णा, जामाता.
शांत कराव्या रुष्ट देवता व्याह्यांनी त्वर्ये
त्याविण नाही सुलभ व्हायचे योजित शुभकार्ये
चौमासांनी मुहुर्त पुढचा उभये निवडावा
सुखेनैव हा लग्नसोहळा नंतर घडवावा.
असे पत्र मी लिहुन धाडिले सुयोधना नुकते
तदनंतर मग वळलो इकडे हिला पाहण्याते.

*श्रीकृष्ण* : सत्य सत्य ते गुरुवर्यांनीं तुम्हा सांगितले
कपट असावे माझे हे मग तुम्हा कसे गमले ?

*बलराम* : कठिण प्रसंगी कुतर्क येती मनुजाच्या माथी

गोष्ट कशाला आता कृष्णा, पुन्हा काढिसी ती.
गेले पूर्ण टळून संकट हरी, चिंता कशाला वृथा
चातुर्मास सरेल, दैवचि करी घेईल रे अक्षता
साम्राज्ञीपद भूषविल भगिनी, मी योजिले त्यापरी
व्हावी उल्हसिता सुखी कुलवती कायामने तोवरी.

*श्रीकृष्ण* : अर्जुन ही रुग्णाइत दिसते
नकळे कसला विचार करते, कुढत उगा बसते
हास्य न उरले नयनीं ओठीं
कण अन्नाचा घेइ न पोटी
तेज नाहिसे होय तनूचे, मुळि न कधी हसते.

*बलराम* : ( आठवून )
विसरलोच मी सांगायाचे
वृत्त सुधामय आनंदाचे
नगरीसन्निध रैवतकावर
आला आहे कुणी यतीश्वर
गर्गमुनींनी स्वयेच कथिले महिम्न मज त्याचे.
त्याच यतीचे श्रीचरणामृत
सकल फलप्रद त्याचा ताइत
गुरुदेवांनीं स्वये आणिले आशिर्वच त्याचे
तीर्थ शिंपडा अंगावरती
बांधा ताइत उजव्या हाती
पुरोहितांनी सांगितले हे ' शब्द ' महात्म्याचे.
या योगे वधु होईल निर्भय
सुलभ सौख्य मग, सुलभ निरामय
गर्ग म्हणाले, ' वरदानच हे सर्व देवतांचे. '

*श्रीकृष्ण* : उशिर मग कशाला, तीस जागे करावे
वचन गुरुमुखीचे आदरे आचरावे
( दासीला )
उठव, उठव, निजसी पाहसी काय वेडे
हळुच हलव अथवा शिंपडी नीर थोडे

*कुसुमावती* : ( सुभद्रेला जागवीत )

उठा देवी, उठा देवी
केवढा वेळ झोपला
पापण्या उघडा आता
ऐकवा शब्द आपला.

*सुभद्रा* : ( उठत )
कुठे असे मी, वनांत कोणी आणविले मजला
रक्तमाखल्या वस्त्रांचा तो पुरुष कुठे गेला ?

*कुसुमावती* : हाच प्रश्न येतसे, मुखांतुनी पुनः पुन्हा
झोप ही नव्हे खरी, अजून गाढ मूर्च्छना.

*सारंगनयना* : उठावे देवींनी, नयन उघडावे पळभरी
समाचारा आले, उभय युवराजे इथवरी.

*सुभद्रा* : ( बलराम आणि श्रीकृष्ण यांच्याकडे पाहून )
अरे दादा, अरे कृष्णा,
उभे कां आसनस्थ व्हा.
सख्यांनो, आसने घ्या ना ?
मूढ कीं मूर्ख ग तुम्ही ?
( दासी आसने देतात. त्यावर दोघे बसतात. )

*श्रीकृष्ण* : अशी शहाणी बहिण न मिळते जगी कुणाला, दादा
हिने सोसला धीर धरुन तो प्रसंग नव्हता साधा
परत परतले वऱ्हाड, गेला परत नियोजित पती
उपवर वधुच्या मनांत असतिल डसत यातना किती ?
मौन धरुन ही स्वस्थ बैसली एका ठायी तरी
अवश्य काही व्यथा सलतसे खोल हिच्या अंतरी.

*बलराम* : अंतरी तिच्याही असेल चिंता घोर
भर वयांत आली, सान नव्हे ही पोर

*श्रीकृष्ण* : संपु दे सुभद्रे, परि हा चातुर्मास
मग पुनः फुलारुन येइल मनिची आस
होशिल खचित तूं त्याच पतीची राणी
कुरुराज्य स्वामिनी, कौरवकुलसम्राज्ञी
डौलांत बैसशिल उत्तुंग गजाच्या पृष्ठी
वेगळी त्यापुढे, तुझी आमुची सृष्टी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ... क्रमांक 20003 दि: ... 2666 ... 95

*सुभद्रा* : ( कपाळ चोळीत )
कां पुनः कानिं ये नको तेच ते नांव
ठणकत्या मस्तकी, पुनः घणांचे घाव !
( पुनः मूर्च्छित होते. )
*श्रीकृष्ण* : पुनः सुभद्रा होते मूर्च्छित
तीर्थ शिंपडा, आणा ताइत
तुम्ही तुमच्या हाते, दादा
ताइत तिच्चिया दंडी बांधा.
*बलराम* : कोण असे रे तेथें, तिकडे
तीर्थकलश तो आणा इकडे
त्वरा करा तो आणा ताइत
स्वास्थ्य न हरवो, ही रूग्णाइत.
(तीर्थ, ताईत, आणविले जातात. बलराम तिच्या दंडात ताईत बांधतो. सर्वांगावर तीर्थोदकाचे मार्जन करतो.)
(सुभद्रा स्वतःला सावरते.)
*श्रीकृष्ण* : बरे सुभद्रा, आम्ही येऊं ?
(सुभद्रा मान डोलावते)
*बलराम* : हरी, चल रैवतकी जाऊं
उभय जाउनी यतीश्वराचे शुभदर्शन घेऊं.
तीर्थ जयाचे संकटनाशक
किती थोर तो असेल साधक
अवतारी त्या योगींद्राच्या चरणी नत होऊं.
*श्रीकृष्ण* : ज्येष्ठ, जाणते आपण दादा
कराल यतिशी सुख-संवादा
साधारणसा प्रापंचिक मी, धजतो नच येऊं
*बलराम* : प्रापंचिक वा मायावेष्टित
माझ्यासंगे तूंहि प्रतिष्ठित
गगाझेसी पाळ मुकुंदा, वेड नको घेऊं.
*श्रीकृष्ण* : दादा, गुरुकृपेची मज पूर्ण जाण आहे
येतो असाच संगे, आज्ञा प्रमाण आहे.
(दोघेही जातात.)

६०००३ दि. ०७।०५
१७८८ १५-७-२७

*सुभद्रा* : *व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं*
*लागला सर्वदां फांस गळीं*
*नच ठावें स्वातंत्र्य कसें तें*
*बंदित वास मुळीं*
*गरिबापोटीं येतें तरि ते*
*मज नच देते बळी*

*कुसुमावती* : नका ऐसा संताप करुन घेऊं
नका ऐशा सारख्या कुढत राहू
नका डोळे सारखे अशा गाळू
नका अश्रुंनी सौंदर्य असे जाळूं

*सुभद्रा* : मी काय करू ग कसे करूं
बोलवू कुणासी, कुणा स्मरूं
*वद जाउं कुणाला शरण करी जो हरण संकटाचे*
*मी धरिन चरण त्याचे, अग सखये*
*बहु आप्त बंधु बांधवां प्रार्थिलें कथुनि दुःख मनिंचें*
*तें होय विफल साचें, अग सखये*
*मम तात जनानि मात्र तीं बघुनि कष्टती हाल ईचे*
*न चलेचि कांहिं त्यांचें, अग सखये*
*जे कर जोडुनि मजपुढें नाचले थवे यादवांचे*
*प्रतिकूल होति साचे, अग सखये.*

*कुसुमावती* : मला वाटे दुःख आतां सरावे
मनासारखे आपुल्या सर्व व्हावे

*सुभद्रा* : कशावरुन हे म्हणसी वेडे

*कुसुमावती* : ऐका थोडे
घडले ते योग्यच घडलें
नावडते टळले लग्न
नातरी हृदयिची स्वप्ने
कायमची होती भग्न
देव ना राहिला सुप्त
तुम्हांसच केले गुप्त
बावरले व्याही आप्त

तुमच्याच परी कल्याणी
परमेश्वर होता मग्न.
या पुढें चार महिन्यांत
घडणार काय वृत्तांत
तो असे कुणाला ज्ञात
विरहार्त जीव प्रीतीचे, होतील पुनः संलग्न

*सुभद्रा* : होण्यमाण कळले आहे कुणाते गडे कां ?
संकटेंच नेती जीवा पूर्ततेकडे ग कां ?
जीव जाळण्यासी मजसी मंडपांत नेले
होम चेतण्याच्या आधी मीच गुप्त झाले
स्वप्न सत्य व्हावे म्हणुनी स्वप्न हे पडे कां ?

*कुसुमावती* : स्वप्नासम ही घडली घटना, अद्‌भुत अगदीं बाई
त्या स्वप्नाचा आदि अंत कां स्मरतो तुम्हा कांही ?

*सुभद्रा* : स्मरते सारे स्वप्न मला ते
अशीच येथे निजले होते
असाच मंचक, अशीच शय्या
इतक्यामध्यें घडली माया
नीज लागली मज या जागीं
वनांत कुठल्या झाल्ये जागी.

*कुसुमावती* : चमत्कार !

*सुभद्रा* : चमत्कार ना आला ध्यानी
गमले मज मी असे उपवनी
उपवन आपुल्या प्रासादांतिल
कुंज लतांचे, वारा शीतल
शीतळली ग माझी नयने
तिथेंच रमले आनंदाने
बघता बघता घटका सरल्या
सांजसावल्या तळी उतरल्या
दिशा लोपल्या, पडली झांजड
तिथे थांबणे झाले अवघड
कोणी मैत्रिण अथवा दासी

समीप माझ्या नाहीं कैसी
अशा विचारें बावरले मन
थकले हाका मारुन मारुन

*कुसुमावती* : बरं मग ?

*सुभद्रा* : इतक्यामध्ये अवचित कुठला
पुरुष साजगी, तिथे प्रगटला
धीट, देखणा, तरुण सुंदर
रक्त तयाच्या वनवेषावर

*कुसुमावती* : कोण बरे तो पुरुष असावा ?

*सुभद्रा* : मी नच पुशिले नांवा गांवा
तोच म्हणे ' हे नाहीं उपवन
हे तर आहे निबीड कानन '
' तुम्ही आला कुण्या कारणें '
' अशक्य मज तें तुम्हा सांगणे. '

*कुसुमावती* : त्यालाहि ते नव्हते ठाउक
अघटित अघटित विस्मयकारक

*सुभद्रा* : विस्मय कसला, कंप दाटला
दादांचा मज धाक वाटला
क्रोधाने ते मला बोलतिल
अंगावरती धावुन येतिल
भिति माझ्या मनि माईना
त्यातच आली तीव्र मूर्च्छना
सरली मूर्च्छा, परत जागृती
परत इथे मी, शय्येवरती.

*कुसुमावती* : स्वप्न म्हणावे कैसे यातें !
मध्यंतरि तुम्हि नव्हता येथे
सत्य म्हणावे तर मग कोणी
तुम्हा नेले इथुन उचलुनी ?
अदृष्टाला नमस्कार हा
अगम्य अगदीं चमत्कार हा !

*सुभद्रा* : चमत्कार ना एकच केवळ

चमत्कार सखि घडले पुष्कळ
द्वारकेत मी पूर्वी असता
शेला ह्यांना दिधला होता
कशिद्याने मी नांव आवडते
त्या शेल्यावर विणले होते
त्या शेल्याने सखी साजणी,
मला झांकिले नकळे कोणी
आणिक त्यांनी मज दिधलेली
रत्नमाळ ना गळ्यांत उरली
माझा शेला मला मिळाला
चोरिस गेली त्यांची माळा

*कुसुमावती* : ऐकावे ते नवल खरोखर
बहरुन येते परंतु अंतर
देवी, तुम्हा प्रसन्न ईश्वर
मनासारखे घडेल सत्वर.

*सुभद्रा* : तुज विचार सुचला असा कसा ?

*कुसुमावती* : मम वचनावर धरा भरवसा

*सुभद्रा* : इतके ना भाग्य माझे, मज आहे माहिती
सुखद व्हावी मजसि ऐसी, सांग घटना कोणती ?
*रुचती कां तीर्थयात्रा या समयी त्यांस ती ?*
*मजवरची प्रेमबुद्धि कां हरिची लोपती ?*
*दादांना अंधजांची भक्ति कां लागती ?*
*या कृत्या साह्य होती कां वहिनी रेवती ?*

*कुसुमावती* : ( स्वगत )
संताप वाढतो यांचा, करावे काय ना कळे
गुंतेल लक्ष अन्यत्र, करावे काय यास्तव ?
( उघड )
दावाल मला कां देवी, लाडका आपुला शेला
मूर्च्छनेंत आपण असता, जो अपाप अंगीं आला
द्वारकेत असता पूर्वी, अर्जुनास आपण दिधला
प्रीतीचा दुवा जरतारी, जो झाला दोघांमधला


साक्षिदार प्रीतीचा तो, आमुच्या दिसो डोळ्यांला.
*सुभद्रा* : पेटीत ठेविला आहे, कुणि बघेल अवचित म्हणुनी
जाणिसी व्यथा तूं माझी, जा पहा काढुनि सजणी.
( कुसुमावती शेला काढते, उलगडून बघते. )
*कुसुमावती* : किति किति सुंदर, किति मनोहर
कुशलतेस ना शोधिलिया सर
कळ्या फुलेही, हे तरुपल्लव
सजिव रंग हे, सजीव लवलव
घडी मोडता हे पक्षी तर
उडुन धुंडतिल अवघे अंबर
( सुभद्रा शेला हिसकावून घेते. )
*सुभद्रा* : नको वाटतो दृष्टिपुढेही मजसी हा शेला
चिंध्या चिंध्या करून वाटते फेकावे याला.
*कुसुमावती* : अपराध तयानें काय अपुला केला ?
*सुभद्रा* : *अरसिक किति हा शेला*
*त्या सुंदर तनुला सोडूनि आला*
*प्रेमें प्राणपतीला, मी संतोषें हा अर्पण केला*
*दुर्मिळ जें स्थळ मजला, ते सहज मिळुनि या दुर्भाग्याला*
*तेथुनि कां हा ढळला ?*
*त्या सत्संगातिला कैसा विटला*
*कोंडुन ठेविन याला, मज दृष्टिस नलगे निष्ठुर मेला*
( शेला फेकून देते. )
*कुसुमावती* : पुनः पुनः अशा कशा स्वतांवरचि कोपला ?
ध्यास एक जागृतीत, तोच ध्यास झोपता
जरा तरी धरावया, हवी तुम्हास शांतता.
*सुभद्रा* : *किती सांगू तुला मज चैन नसे*
*दुःख तरी मी साहु कसे*
*या समयीं मला नच कोणी पुसे*
*हा विरह सखे, मज भाजितसे*
*मन कसें आवरूं*
*किती धीर धरूं, कसें करूं*

*हे बंधु नव्हेत मम वैरी खरे*
*दावीती कसें वरि प्रेम बरें*
*बोलोनी पाडीती हृदयासी घरें*
*नको नको मला जिव*
*विष तरि पाजिव*
*सखे, सोडिव.*

( इतक्यात घाईघाईने विदूषक प्रवेश करतो. )

*विदूषक* : चला सुभद्रादेवि चला
पाटावरती यती बैसला.
तूप वाढले, उदक सोडले
तुम्हांवाचुन भोजन अडले
यतिराजाचा हात थांबला
तुमच्या हाते द्या हस्तोदक
हा दादाचा हुकुम अचानक
तेच हवे त्या संन्याशाला

१६८८ १५-



प्रिये, पहा रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल हा

# अंक तिसरा

( द्वारका नगरीच्या राजप्रसादातील एक कक्ष.
बलराम आणि श्रीकृष्ण परिमित सेवकांसह प्रवेश करितात. )

*श्रीकृष्ण* : मज बालबुद्धिचा म्हणा हवेतर ज्येष्ठा
परि संशयकारक गमति यतीच्या चेष्टा
वाढवा कितीही तुम्ही त्याचे स्तोम
या यतींत दिसते मजला कांहीं गोम.

*बलराम* : ( एकदम संतापून )
आवरी आपले तोंड रे नास्तिका
निंदिसी व्यर्थ कां ? थोर त्या साधका
निंद्य तुज वाटते पूज्य यतिमाउली
परमसीमा तुझ्या बुद्धिची जाहली.

*श्रीकृष्ण* : येतो जर राग तुम्हा उगिच एवढा
बसतो मी गिळुन मूग, मूक बापडा
प्रामाणिक आत्ममता मांडता पुढें
चिडला कां माझ्यावर व्यर्थ एवढे ?

*बलराम* : अनुचित कां सांग यती वागला कुठे ?

*श्रीकृष्ण* : मीच काय, कथिल कुणी पोर धाकुटे.
*बघुनि सुभद्रेला कसा यति वेडावुनि गेला*
*हस्तातिल ती गोमुखि गळली*
*आशीर्वचनी जिव्हा चळली*
*नासिकाग्र दृष्टिही वळली*
*निर्लज्जचि झाला*
*टकमक मुख ते बघण्याला.*
*बलराम* : किती हीन या कल्पना बोलसी तू ?
तुझ्या मानसी दुष्ट कुत्सीत हेतू
तुझ्या सारख्यांची नको व्यर्थ पीडा
म्हणूनी यती नांदती दूर, मूढा,
( अस्वस्थपणे )
निंदिलास तूं यती निरंजन
परमहंस तो सिद्ध दयाघन
बुडालास तू अध–जलडोही
बुडविलेस रे सवे मलाही
अनुज न हरि, तू, वैरी दुर्जन.
*श्रीकृष्ण* : नका रागवू दादा मजवर
अल्पमती मी बालक नवथर
पण–
*जेव्हां जेव्हां वाढायाते येइ सुभद्रा ती त्या यतितें*
*भुलुनि पाहुनी तद्रूपातें तैसे नाना ढंग करी*
*पंक्तीमध्यें नसतो जर मी भोळे तुम्हा पाहुनि*
*भलते भलते करता स्वामी निश्चयपूर्वक मज वाटे.*
*बलराम* : ( संतप्त )
आग लागो वाणीस, जळो जिव्हा
जाण येवो येईल तुला जेव्हां ?
काय सांगू तुज वेड्या मुंकुदा ?
ज्ञान सांगावे काय चतुष्पादा.
*श्रीकृष्ण* : खरा असो किंवा खोटा यती तो बिचारा
खरा राग आला तुम्हां ऐकुनी विचारा

चुकुन एक बोलुन गेलो वाक्य मी मजेने
मान्य वचन तुमचे, तुम्ही ज्येष्ठ अनुभवाने.

*बलराम* : साधुसंतांची करतोस तूं कुचेष्टा
मान देशिल कां ज्येष्ठ वा वरिष्ठा ?
ज्येष्ठ बंधूची लव न तुला भीती
तुझी तुजला लखलाभ कृष्णनीती.

*श्रीकृष्ण* : रागेजणें बरें कां ? ऐसे क्षणाक्षणाला
दादा क्षमा असावी, माझ्या खुळेपणाला
जर भावते मला कीं इतके चिडाल तुम्ही
तर बोलतो कशाला, मुखस्तंभ राहतो मी.

*बलराम* : अनुभव मज आला हाच हा कैकवेळा
फिरुन फिरुन कां रे खेळसी त्याच खेळां ?
हटकुनि हरि होसी पक्ष माझ्या विरुद्ध
चिडविसि मज कृष्णा, होतसे मीहि वृद्ध
तगमग मग माझी, चालते चित्त क्षोभे
तुजसि सुख कशाचे, काय आनंद लाभे ?

*श्रीकृष्ण* : सोडून द्या तो विषयच दादा, शब्द झगडती वायां
क्षमा करावी बालकास या, शिवतो मी पायां
( बलरामाचे पाय धरतो. )

*बलराम* : ( स्वगत )
रखरखणाऱ्या दुपारची कीं शीतळ व्हावी संध्या
लबाडास या आहे अवगत अशी विलक्षण विद्या
( उघड )
ऊठ माधवा, इथुनी पुढती सूज्ञपणानें वाग
पाया कशाला धरिसी वत्सा, सरला माझा राग
( थोड्या वेळाने )
यतिविषयी त्या विचार कांहीं मनांत माझ्या आला...

*श्रीकृष्ण* : बोला.

*बलराम* : आज्ञाधारक होती पूर्वी किती सुभद्राबाला
आजकाल पण स्वभाव हट्टी फार तिचा झाला
मला वाटते तिनें करावी यतिराजांची सेवा

तृप्त यतीचा वरदहस्त तिज कृष्णा, लाभावा
त्या लोभानें मनःशांतता प्राप्त तिला व्हावी
वाटावा तिज योग्य सुयोधन, पती तिचा भावी
यास्तव व्हावा वास यतीचा तिच्या मंदिरामाजी
कशी काय ही तुला वाटते योजकता माझी ?

*श्रीकृष्ण* : मान्य ना मजसि हे, स्पष्ट मी बोलतो,
अंधश्रद्धेस या, दंडवत घालतो.
हरिणिच्या रक्षणा, आणावा केसरी
सोपवा संपदा, तस्कराच्या करीं

*बलराम* : कृष्णा,
पाप ज्याच्या मनीं मानसी दाटले
पुण्य ज्या जीवनीं मुळीच ना भेटले
तस्कराशीं यती, मूर्ख तो तोलतो—

*श्रीकृष्ण* : मान्य ना मजसि हें स्पष्ट मी बोलतो.
सुटते आहे लव मर्यादा
बोलाया पण हवे एकदां
सहवासासी येता युवती
यती आपुल्या तपा विसरती
मुनी विरागी समर्थ योगी
बघता बघता झाले भोगी
द्वापारिंची गोष्ट कशाला
सत्ययुगींही तोच दाखला.
*वसंतीं बघुन मेनकेला*
*गाधिजमुनिनें निज सुतपावरि उदकांजलि दिधला*
*पराशर मोहुनियां गेला*
*नौकेमाजी धीवर—कन्यासंगोत्सुक झाला*
*वसिष्ठहि ब्रह्मनिष्ठ कसला*
*परि स्नुषेवरि लोभ धराया मनिं नच तो विटला.*
मोठे मोठे योगी, योगेश्वरही स्वतां जिथे फसला
तेथें तरुण यती हा, दादा धरितो टिकाव हो कसला!
हा तर दिसतो चंगी भंगी

यती बनावट, अगदी ढोंगी
संन्याशाचा वेष तयाचा
त्यांतही उसळे रंग वयाचा.
*लाल शालजोडी जरतारी झोकदार शिरी बांधोनी*
*नाचत चाले जैसा येतो रंगभूमिवर नट सजुनी*
*वाजे कडकड छाटि गुलाबी माळ जपाची करिं धरुनि*
*ध्यान धरुनि बैसतां दिसे मज दांभिकपण वर ये फुटुनि*
*सर्वांगावर भस्माचे ते पुंड्र लावि किति रेखोनी*
*त्यावरि रुद्राक्षांच्या माळा घालितसे तरि किती जपुनी*
*स्फटिकांचीं तीं सुबक कुंडलें डुलताना हलती कानीं*
*पायिं खडावा चटचट करिती दंड शोभती करिं तीन्ही.*
म्हणुन सांगतो दादा यतिते अन्तःपुरिं ना ठेवा
प्रामाणिक हा विरोध माझा अवश्य ध्यानी घ्यावा.

*बलराम* : कळे न तव कावा, शिकविसी ज्ञान वडिलभावां!
स्वरूपसुंदर तरुण कधीं ना होऊ शकतो योगी
विचारधारा तुझी नसे ही विचार करण्याजोगी
तुझाच झाला ऐसा ग्रह कां? कारण याचे शोधी
नको रागवूं उघड बोलतो, तुझियासंबंधी

*श्रीकृष्ण* : राग कसा मज येइल दादा, तुमच्या वचनाचा
अधिकारच तो आहे तुमचा, प्रेमळ वडिलांचा

*बलराम* : उलट अर्थ घेसी यतिच्या सरळ वागण्याचे
तुझ्या मनीं असती कृष्णा, दिवस चांदण्याचे
कनक कामिनीच्या जाती कधीं ना अहारी
असे कैक असती योगी बालब्रह्मचारी!
चोर जार नवलच करिती अशा बोलण्यांचे.

*श्रीकृष्ण* : मज चोर म्हणा कीं पोर म्हणा
मम मुखी न येईल शब्द उणा
रुग्ण सुभद्रा दिवस कंठिते
नका आणवूं यतीस तेथें
संकट पुढचे मजसी दिसते
प्रार्थना म्हणुन ही पुनः पुन्हा

मज चोर म्हणा कीं पोर म्हणा...

*बलराम* : फिरावयाचा नाहीं निश्चय ? विश्व जरी हे फिरले
मला वाटते तेच करिन मी, ठरले जें तें ठरले

*श्रीकृष्ण* : बोलणेच मग सरले माझे
आपण आपुल्या मनिंचे राजे !

*बलराम* : वाद पुरे झाला, लागुं दे मजसि व्यवस्थेला—
( बलराम जातो. )

*श्रीकृष्ण* : (स्वगत)
कलहास रंग आला, कट होतसे यशस्वी !
दादास सत्य वाटे, तो नाटकी तपस्वी.
फसवीत नाहिं ना—मी, निष्पाप बांधवाला
अंती सुखावहा जी, ती क्षम्य कृष्णलीला
तरि ताण फार झाला, माथें दुखे मनस्वी
मनोविनोद होइल तेथें
आतां जावे विश्रामाते
कोणत्या पत्नीस भेटूं ? कैक माझ्या स्वामिनी
रुक्मिणी कीं भामिनी
भामिनी की रुक्मिणी ?
रुक्मिणीच्या मंदिरी जरा जावे
तिने आनंदे स्वागतास यावे
असें ठावे की, होणार तसे नाहीं
रुष्ट वैदर्भ असणार तिच्या ठायीं
*बहुत दिन नच भेटलो सुंदरीला*
*म्हणुनि धरुनि बैसेल रुष्टतेला*
*करिन जेव्हां मी बहुत आर्जवाला*
*पात्र होइन मग मधुर सुहास्याला*
( श्रीकृष्ण रुक्मिणीच्या शय्यामंदिराकडे जातो. रुक्मिणी मंचकावर निद्रिस्त आहे. कोकिला नावाची दासी शय्यागृहात उभी आहे.)

*श्रीकृष्ण* : झंकार नसे वीणेचा, गायिका न दिसते कोणी
कोकिले कुठे ग गेली, लाडकी रुक्मिणी राणी ?

*कोकिला* : नुकतीच लागली झोप, मंचकी पहुडल्या देवी

*श्रीकृष्ण* : जागते फार कां रात्रीं ? कां नीज अवेळी यावी ?

*कोकिला* : जागरणें घडती रोज

विसरली लोचनें नीज

ही रितीच उरते शेज

जागती एकट्या देवी, डोळ्यांतुनी झरते पाणी

*श्रीकृष्ण* : जा जागव तिज, माझ्याकरतां

आगमनाची कळवी वार्ता

*कोकिला* : ( रुक्मिणीच्या मंचकाजवळ जाऊन )

नयन दळें ही उघडा लौकर

शयनमंदिरी आले यदुवर

*रुक्मिणी* : ( त्रासिकपणे )

आतांच कुठे मी

झोपले जराशी

तोवरी कशाला

आलीस उशाशी ?

चोंवड्या कोठल्या

उगाच छळिती

मागील जन्मींच्या

जणुं या सवती !!

*कोकिला* : देवी--

( खुणेने कृष्णागमन सांगते. )

*रुक्मिणी* : ( कृष्णाकडे पाहून किंचित लाजलेसे करून मंचकावरून खाली उतरते. )

नीज नाही पुनः यायची मज गडे

होइ उष्मा अती, पार वारा पडे

मजसि चल घेउनी त्वरित जलमंदिरी

शितळतो कां बघू दाह तेथें तरी

*श्रीकृष्ण* : दास येथें उभा, लक्ष द्या त्याकडे

( रुक्मिणी कृष्णाकडे येते. कोकिला दासी जाते. )

लाडके रुक्मिणी, कृष्णमनमोहिनी

गगनही बघ कसे येइ झाकाळुनी

*नभ मेघांनीं आक्रमिलें*

तारागण सर्वहि झांकुनि गेले
कडकड कडकड शब्द करोनि
लखलखता सौदामिनी
जाताताचि नेत्र दिपोनि
अति विरहि जन ते व्याकुळ झाले

रुक्मिणी : तुमच्या विरहे झुरती युवती
जा सुखवा जा माझ्या सवती
मंदिरी माझ्या कशास आला
स्वप्नातच मज भेटा, बोला
मोडिलीत कां निद्रा माझी
अवचित येउन अर्ध्या रातीं ?

श्रीकृष्ण : नच सुंदरि करु कोपा, मजवरि धरिं अनुकंपा
रागाने तव तनु ही पावत कशि कंपा
नारी मज बहु असती
प्रीती परि तुजवरती
जाणसि हे तू चित्ती
मग कां ही अशि रीती
करिं मी कोठे वसती
तरि तव मूर्ती दिसती.
प्रेमा तो मजवरिचा नेउं नको लोपा—

रुक्मिणी : शब्दें मज घेरु नका
साखर वर पेरुं नका
अपराधा विसरु नका
शिक्षेला कचरु नका
गृहिणीचा राग नसे सोपा—प्रेयसिसम

श्रीकृष्ण : मान्य मान्य शब्द तुझा
उशीर नको देइ सजा
न्याहळसी काय नभा
अपराधी येथ उभा
सुटका नच इच्छित मी दावुन अनुतापा—
करपाशी या तनुला

*बांधुनि कर शिक्षेला*
*धरुनीया केशाला*
*दंतव्रण करि गाला*
*कुचभल्ली वक्षाला*
*टोचुनि दुखवीं मजला*
*हाचि दंड योग्य असे सखये मत्पापा—*

*रुक्मिणी* : काय बोलावे कुणी इथे बाई
अजुन जडलेली संवय सुटत नाहीं—
( दोघेहि मंचकावर बसतात. )

*श्रीकृष्ण* : ताप स्वतःला, ताप दुजाला
हवा कशाला कलह अबोला ?
घरांत आहे लगीन घाई
आले गेले अतिथि व्याही
तशांत आले संकट अवचित
वधू सुभद्रा हो रुग्णाइत
गुंतुन गेलो त्यांतच मीही
इकडे येणे जमलें नाहीं
जमले नाहीं तुज भेटाया
रागेजुन तूं बसलिस वायां ?

*रुक्मिणी* : आहा, आहा, आहा, आहा,
त्या लग्नाशीं तिळभर नव्हते नाते—गोते
माहित आहे सर्व मला तें, मीही पाहत होते
एक प्रश्न पण पडला मजसी विचारीन म्हणते
हृदय मोकळे करुनी नाथा, उत्तर द्या माते

*श्रीकृष्ण* : प्रश्न कशाचा कसले उत्तर
रात्र पोचली बघ मध्यावर

*रुक्मिणी* : वाढु देत रात वा प्रभातकाल होऊ द्या
आपुल्या मुखातुनी मला समग्र ऐकुं द्या

*श्रीकृष्ण* : काय ?

*रुक्मिणी* : लग्न मोडले, पुढती पडले, असे ऐकिले मी
घोटाळ्यातुन साध्य काय या पुढती परिणामीं ?

*श्रीकृष्ण* : म्हणतेस व्यर्थ तूं घोटाळा कां यास ?
होईल लग्न तें, सरतां चातुर्मास !
*रुक्मिणी* : हा बेत ठीक आहे, तुमचा विचार झाला
हे मान्य जाहले कां, सौभाग्यकांक्षिणीला ?
*श्रीकृष्ण* : हवी कशाला उठाठेव ही तुला मला वेडे
समर्थ असती दादा, अवघे उकलाया कोडें
कुलप्रमुख ते, वडिल वयानें, त्यांना सारे कळते
तुझे लक्ष कां उगिच रुक्मिणी विषयां या वळते ?
या विषयीं मी प्रश्न एकदा त्यांना होता केला
रागेजुन ते काय म्हणाले ठाउक नाहीं तुजला.
'या विषयावर नको अगदीं लक्ष यांत घालू'
सांभाळाया हवीत सारी वडिलपणाची नातीं
उरले आहे काय सांग ना आतां माझ्या हातीं ?
*रुक्मिणी* : भाउजींचा कौरवांकडे ओढा
योग्य त्यांना वाटतो म्हणुन जोडा
नणंदेला माझिया पटत नाही
थोर तुमचा ऐश्वर्यवंत व्याही
नांदणें ते शेवटी तिच्या दैवी
जाण याची तुम्हास कां नसावी ?
मान्यतेनें त्यांच्याच कार्य व्हावे
उभय बंधुंनी ध्यानांत जरा घ्यावे
बहिण तुम्हा एकटी एक आहे
तिच्या भाळी रेखला दुःख कां हे ?
जन्मगांठ या सुटती न कधीं काळीं
काय करणे ते करा योग्य वेळीं.
हट्ट नाहीं हटणार भाऊजींचा
मौन तुमची बांधवापुढें वाचा
अबल असती बायका जगीं जात्या
फट्ट म्हणता होईल ब्रह्महत्या !
नांव वंशाचे जाईल जनामाजीं
लक्ष घाला, घालते शपथ माझी

वंश नाहीं हा एकट्या कुणाचा
मान राहो जगतात यादवांचा.

*श्रीकृष्ण* : ( रागावल्यासारखे करून )
समजला समजला, हेतु तव रुक्मिणी
वेगळे वर हवे, पाहिजे वाटणी
समजले मज तुझे गुळमुळ बोलणे
बंधु बंधूत तूं लाविशी भाडणें
पत्नि कलहप्रिया, पतिस हो वैरिणी ...
ज्ञात गे रीत ही सर्व प्रापंचिका
वांकडे आणिती प्रियजनीं बायका
मोडिती वरकुलें, तुडविती भांडणा ...

*रुक्मिणी* : ( संतापून )
उगीच कां हा गहजब बाई माझ्यावरती असा
बाल्यापासुन ओळखिचा हा बहुरुप्याचा वसा
धमकावणि ही कुणास देता, मी न भ्यायची मुळीं
तुम्हा वाटते तैसी नाहीं विदर्भकन्या खुळी
विषय टाळुनी कुठे निसटता इथे मंचकी बसा...
मोजुन चौथी खेप असे ही सांगा कांहीं खरें
पुनः पुनः कां विषय टाळता ? हे न वागणें बरें
हवा वेगळा प्रपंच मज हा शोध लागला कसा ? ...
बहिणीसाठी शोधुन आणा तिच्या प्रितीचा वर
मी न इच्छिते जन्मांतरिंहि करु वेगळे घर
कलह लाविती प्रपंचात त्या असोत कुणी अवदसा ...

*श्रीकृष्ण* : *अति कोपयुक्त होय परी सुखविते मला*
*भृकुटि वक्र करुनि बघत*
*गाल लाल सर्व होत*
*थरथर तनु कांपवीत*
*इंदुवदनिं घर्म सुटला*
*जणु कनकाची मूर्ति अग्निमाजिं तावली*
*कीं नभ सोडुनि वीजचि ती खालिं उतरली*
*कीं ज्वलनाची ज्वाला कुंडात पेटली*

*एक जागीं पद न ठरत*
*हृदय भरत रिक्त होत*
*अधर बिंब काय फुटत*
*तेवि वरी दंत रोविला...*
कोपुं नको, जवळ जरा बैस ग अशी
परिहासा काय सखे सत्य मानिसी ?
चुकून शब्द येइ मुखीं, विसर सुंदरी
राग राग करिसी कीती, राहसी दुरी.

*रुक्मिणी* : हा कसला परिहास नाथा, हा कसला परिहास !
कटु शब्दांनीं घरें पाडितां दुसऱ्याच्या हृदयास
ओळखिते मी सोंग, बहाणा
निमित्त कांहीं हवे प्रयाणा
शुभारंभ हा म्हणुन भांडणां
नको नकोसा झाला तुम्हा, रुक्मिणीचा सहवास

*श्रीकृष्ण* : नको करू ग कठोर वाचा
जा म्हटल्या मी नाहिं जायचा
हांस एकदा हांस मोकळी
बैस राजसे माझ्या जवळीं.

*रुक्मिणी* : नको नकोशी झाले तर मी जवळ कशाला बसू ?
अप्रिय माझे दर्शन तर मी उगिच कशाला हंसू ?

*श्रीकृष्ण* : चुकलो, चुकलो, मान झुकवितो
विचारसी ते सर्व सांगतो
परंतु राणी, सोड राग तो.
पाया पडतो, पदर पसरतो

*रुक्मिणी* : ( येऊन जवळ बसत )
असे जरा या राजपथावर
रागावे मग कोण कुणावर

*श्रीकृष्ण* : एकवार पुनः । कळुं दे म्हणणें
काय ग मागणें । तुझे देवी !

*रुक्मिणी* : सुभद्रेच्या मनीं, भरला अर्जुन
तुम्हीच वचन, दिले तीते

तुम्हीच तियेला, लाविलीत आशा
आतां कां निराशा, तिच्या माथीं
शोधुन पार्थासी, आणा द्वारकेंत
तिचे मनोरथ, करा पूर्ण.

*श्रीकृष्ण* : तेच कार्य चालू आहे नम्र सेवकाचे
बहुत करून होतिल हेतु, पुरे सुभद्रेचे

*रुक्मिणी* : आशिर्वाद नकोत व्यर्थ मजला आतां हवी निश्चिती
केले काय तुम्ही, कराल काधिं तें, व्हावे मला माहिती.

*श्रीकृष्ण* : हुं !

*रुक्मिणी* : आतां थापा नका नवीन जुळवूं, सांगा खरे तेवढे
कां हो मौनव्रता धरुन बसला, कैसे पडे साकडे

*श्रीकृष्ण* : सांगतो सर्व मी आतां
गुप्त ते, गुप्त राहू दे
गौप्य ना पाळिती नारी
ख्यात ती जात बोलकी
सांगतो त्यांतले कांहीं
षट्कर्णी जाहले तर
यदूंच्या थोर वंशाची
छीः थुः होइल रुक्मिणी.

*रुक्मिणी* : तोलता मला कां सामान्यांच्या तोली
इतकीच परीक्षा आजवरि कां झाली ?
राखीन गूज मी शपथ पदांची नाथा
समजु द्या परंतु गूज एकदा आता

*श्रीकृष्ण* : श्रवण मजकडे घे, गोष्ट ही गुप्ततेची—

*रुक्मिणी* : (झिडकारित)
अवगत मज नाहीं रीत ही चुंबनाची

*श्रीकृष्ण* : कठिण कठिण बुद्धि बायकांची वळाया
पळभर ठर जागी वेळिशी मान वाया
(कानांत सांगतो)

*रुक्मिणी* : (आश्चर्याने)
खरेच कां तो आहे अर्जुन

*श्रीकृष्ण* : तूंच पहाना जरा न्याहळुन !
क्षणांत तुजला पटेल ओळख
संन्यासाचे केवळ नाटक !
*रुक्मिणी* : विवाह करणें शक्य कसे पण होइल संन्याशाला ?
*श्रीकृष्ण* : (पुनः कानात सांगतो)
जाणिवपूर्वक सर्व घडतसे, विचार पूर्वी केला.
*रुक्मिणी* : आनंदी आनंद, सरे सर्व चिंता
कुठे ठेऊं आतां, सौख्य माझे
दिला व्यर्थ दोष, उगा बोलले मी
क्षमा करा स्वामी अर्धांगिसी–
*श्रीकृष्ण* : चौघडा झडे महाद्वारी
पहाट झाली बघता बघता रात सरे सारी
*रुक्मिणी* : सोडा, नाथा, जाउ देत ना
झटकन घेते उरकुन स्नाना
आज जायचे असे दर्शना
*श्रीकृष्ण* : थांब थोडकी, पहा दृश्य हें नेत्रमनोहारी–
*प्रिये पहा रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल*
*थंडगार वात सुटत, दीपतेज मंद होत*
*दिग्वदनें स्वच्छ करित, अरुण पसरि निज महा...*
*पक्षि मधुर शब्द करिति, गुंजारव मधुप वरिति*
*विरलपर्ण शाखि होति, विकसन ये जलरुहा...*
*सुखदुःखा विसरुनिया, गेले जे विश्व लया*
*स्थिति निज ती सेवाया, उठले कां तेंच अहा . . .*



**रुक्मिणी :** कोणत्या देशिंचा चोर तूं दांभिका ?
फसविसी काय तू उभय यदुनायका
वंद्य बंधू तया देसि पददर्शना
लाज ना वाटते तुजसि का अर्जुना ?

# अंक चवथा

( राजप्रासादातील एक कक्ष. यतिवेषधारी अर्जुन आसनस्थ. )

अर्जुन : ( स्वगत )

*दिसली पुनरपि गुप्त जाहली प्रिया सुभद्रा घोर वनीं*
*येथे सुंदरी कैशी आली हेंचि कळेना मज अजुनी*
*माझ्या वेषा खरें मानुनी हलधरहि लागत भजनीं*
*त्रिकालज्ञ परि मोह पावले कसे न कळे गर्गमुनी*
*कपटी कृष्णाचीही बुद्धी गेली कशी ती भुलुनी*
*या सर्वांचा विचार करितां जातो मूढचि होवोनी.*
*नीरक्षीरालिंगनरूपी स्नान तुला ते घालोनी*
*माझ्या अवलोकनवस्त्रांनीं टाकिन तनु झांकोनी*
*त्वत्प्रीतीच्या रक्तपणाच्या कुंकुमतिलका लावोनी*
*तव तनुलतिकायौवनपुष्पे घालिन तुजवर गुंफोनी*
*चिंतनिं तूझ्या श्वास जाति जे धूपापरि घे मानोनी*
*मदन पेटवी तनुकर्पूरा ओवाळिन तुज लागोनी*
*नैवेद्यास्तव देईन माझा अधर घेई अपुल्या वदनीं*
*कपटाचरणा केले त्याची क्षमा करी गे हरिभगिनी*

(मोठ्याने)
नारायण! नारायण!!
(दासी कुसुमावती प्रवेश करते)

*कुसुमावती* : काय निमित्ते हे पाचारण?
करा यतिवरा, आज्ञा आपण.

*अर्जुन* : (एकदम संतापून)
दूर राही उभी, बटकिच्या पोरटे
तूंच येसी पुढे, अन्य गेल्या कुठें?
दिसत तुज नाहीं कां वस्त्र हें सोवळे
थडकसी येउनी, फुटलि कां बुबुळें?
(सारंगनयना येते)

*सारंगनयना* : (कुसुमावतीस)
कां ग कुसुमावती
भडकला कां यती?

*कुसुमावती* : दैव हें, ग्रहगती!
नसे सुभद्रा समोर तेव्हां असाच हा चिडतो
वेष विसरतो, असेच कांहीं कोपें बडबडतो

*सारंगनयना* : शनिराज फिरे हा राजभगिनिच्या भंवती
संपेल कधिं ही न कळे साडेसाती?

*कुसुमावती* : हळू बोल बाई, कोणी करिल ग चहाडी
दासिजना शोभत नाहीं सूर हा पहाडी.

*अर्जुन* : नारायण, नारायण, नारायण, नारायण!

*सारंगनयना* : कळावे कुणां भाव या भाषणाचे
करावे किती अर्थ 'नारायणा' चे
यतीसी घडे पुण्य पारायणाचे
घराला जडे वेड वेडेपणाचे!

*अर्जुन* : नारायण, नारायण!

*कुसुमावती* : (पुढे येऊन)
दासी आम्ही, आम्हां न कळे तुमचा 'नारायण'
करावे स्पष्टपणे भाषण–

*अर्जुन* : थांबला कशाला दोघी येथुन चला

परिचार रुचेना दासिजनांचा मला
बलराम कृष्ण तर मुळीं न येथें दिसती
लोपल्या कुठें या राजगृहांतिल युवती ?

*कुसुमावती* : यदुकुळात आतां युवती आहे कोण ?
द्वारकाधिशांची एक धाकटी बहिण !

*अर्जुन* : नारायण, नारायण !

*कुसुमावती* : ( सारंगनयनेस )
सुभद्रा देवींना कळव सखये जाउन झणी
यतीराजा हाती सतत तुमची मात्र स्मरणीं.
( सारंगनयना जाते. अर्जुन वाट पाहात राहतो. )

*अर्जुन* : ( कान देऊन )
अहा येतो कानीं पदरव तिचा मंजुळ किती
प्रिया आली आली, हृदयीं मम उर्मी उसळती.
( सुभद्रेऐवजी रुक्मिणीच प्रवेश करते. )

*रुक्मिणी* : ( कुसुमावतीस )
हात जोडुनी उभी इथे तूं कैसी कुसुमावती ?
राजगृहिची शुभवार्ता तुज नाहीं कां माहिती ?

*कुसुमावती* : सकाळपासुन इथें थांबलो अहो, महादेवी
राजगृहांतिल वार्ता कैसी व्हावी मग ठावी ?

*रुक्मिणी* : नृपभगिनीचा विवाह ठरला
तिथिनिश्चयही नुकता झाला
देवप्रतिष्ठा आणि केळवण
आजच घ्यावे म्हणते उरकुन
उसंत आतां पळभर नाहीं
सुरूच झाली लगीन घाई
जा, जा, जा, बाई
लक्ष तूं जातीने देई . . .

*कुसुमावती* : सेवेस येथच्या येतिल मग त्या कुठल्या
हा यती काढतो आठव उठल्यासुटल्या

*रुक्मिणी* : पुष्कळ सेवा होय यतीची
आतां सेवा प्राणपतीची !

१६८६९

मघा म्हणाले मजसी कोणी
उद्यांच आहे महापर्वणी
चतुर्मास्य व्रत यतिचे सरले
पुण्य आपुल्या गाठीं उरले
समुद्रतीरी सारे जाऊं
उद्यापनही उरकुन घेऊं
दानदक्षिणा करून समर्पण
उद्यां यतीची करू बोळवण.

*अर्जुन* : ( घाबरून )
नारायण, नारायण !

*कुसुमावती* : महादेवि, मज कळले नाहीं
केळवणाची कां ही घाई ?
अजुन नाहीं वऱ्हाड आले
नाहीं रचिले, नवे बोहले

*रुक्मिणी* : प्रश्न ग किती पुससि तूं तरी
लग्न व्हायचे हस्तिनापुरी
विघ्न ते नको फिरून यावया
म्हणुन हा सुचे मार्ग जांवया
चौकशी पुरे, जाइ सत्वरीं
न्हावु घाल जा, त्वरित नोवरी.

*कुसुमावती* : स्वामिसन्निधि कोणि ना इथें

*रुक्मिणी* : थोडकी इथे मीच थांबते.
( कुसुमावती जाते )

*रुक्मिणी* : ( अर्जुनाजवळ जाऊन, हात जोडून )
हे यतिदेवा, सांगा सेवा –

*अर्जुन* : आग लागु दे तव सेवेला पार करपु दे वाणी
होइ चालती येथुनिया तूं जाई अन्य ठिकाणी
हीच तुला आज्ञा, सांगणें अधिक नको सूज्ञा –

*रुक्मिणी* : लग्न ठरले माझिया नणंदेचे
त्यांत संन्याशा, तुझे काय वेचे
आव अगदीं आणिसी जरी मोठा

मला वाटे संन्यास तुझा खोटा.

*अर्जुन* : ( संतप्त )

वनराजाचे भक्ष्य घेउनी जातो कोणी कोल्हा

ऐकुनिया ही वार्ता केवळ कोप मला आला

अशुभ तुझी वाणी, पुन्हा ना यावी या श्रवणी !

नारायण ! नारायण !

*रुक्मिणी* : कोणत्या देशिंचा चोर तूं दांभिका ?

फसविसी काय तूं उभय यदुनायका

वंद्य बंधू तया देसि पदद्दर्शना

लाज ना वाटते तुजसी का अर्जुना ?

( अर्जुन दचकतो )

वीर तूं, वरिसि कां हीन या नाटकां ?

*अर्जुन* : अवघड घटिका ही भोग भाळास आला

वहिनि कर क्षमा तूं, आपल्या देवराला.

( रुक्मिणीला नमस्कार घालतो. )

*रुक्मिणी* : ( हसून )

ऊठ, अर्जुना ऊठ !

*अर्जुन* : नकोस उघडु जनांत वहिनी, ठेव झांकली मूठ !

*रुक्मिणी* : उठ, अर्जुना ऊठ !

*अर्जुन* : अभय म्हण मुखाने देइ आशिर्वचासी

तरिच मज धिरावा, लाभणें निश्चयेसी

चुकुन करु नको तूं सर्व लोकांत शोभा

चरणि शरण आलो, आठवी पूर्व लोभा

( साष्टांग नमस्कार घालतो. )

*रुक्मिणी* : उठुन बस जरासा वृत्ति ठेवी धिराची

करविन का शोभा मीच माझ्या दिराची

सहज वदुन गेले मीहि कांहीं विनोदे

सुयश पण तुझ्या या साहसाते मिळूं दे.

( अर्जुन उठून परत आपल्या आसनावर बसतो.)

दीक्षा घेउन विधिपूर्वक तूं होसी संन्यासी

विवाह आतां अशक्य पार्था, जरी सुभद्रेशी

*अर्जुन* : नांव घेउनी नकोस बोलू चुगली खातिल भिंती
जिवापाड मी जपले जें तें फुटेल भांडे अंती.
*रुक्मिणी* : सुटका यांतुन कशी अर्जुना ?
*अर्जुन* : नांव घेसि तूं पहा पुनः !
कळलें मज की प्रिया सुभद्रा विवाहिता होते
डावलुनी मज देतो तिजसी कौरव-राजाते
वैतागे मी पुरा पेटलो झालो संन्याशी
नकळे कैशी खरीच जडली भक्ति दादांशी
सन्माने ते घेउन आले मजसी या गेहीं
पुनः सुभद्रा दिसली वहिनी, फुलली पुण्याई
कठिण यापुढें सुटका माझी, आणि सुभद्रेची
भ्रमिष्ट झालो, धांव थांबली माझ्या बुद्धीची.
*रुक्मिणी* : मला सुचलेला मार्ग असे नामी
कान इकडे घे, सांगते तुला मी
( त्याच्या कानांत सांगते. )
सिंधुतीरी पाहून योग्य संधी
तूंच युक्तीने कार्य तुझे साधी.
*अर्जुन* : असे साह्य ना रुक्मिणीकांत याला ?
*रुक्मिणी* : उद्यांचे, उद्या, आज सांगू कशाला ?
यशःश्री सदा साहसा साथ देते
बरें, स्वामिजी मी अनुज्ञेस घेते.
*अर्जुन* : नारायण ! नारायण !
*मोडुनि दंडा फेकुन देइन भिकार भगवीं वस्त्रें*
*मशकापरि तीं उडविन सारीं यादवचमुशस्त्रास्त्रें*
*आतां बळ आलें, दुर्दिन सर्वहि ते गेले.*



बलराम : हा भगिनीचा कर तव करि धनंजया घे दिधला.

अर्जुन : अत्यादरपूर्वक मी याचा स्वीकार पहा केला.

कृष्ण : नांदा सौख्यभरे,

शोभो कुल तव सत्कुमरें.

# अंक पांचवा

( एकटी रुक्मिणी स्वतःशींच गात आहे.)

*रुक्मिणी* : साहस साजे तरुण प्रेमिका
युवक असो वा असो बालिका
पार्थ घेउनी वेष यतीचा
करितो अनुनय विनयवतीचा,
लिहिली होती प्रेमपत्रिका,
अशीच मीही यदुकुलतिलका.
आठवले मज माझे यौवन,
रथावरोहण आणि पलायन,
कुंडिनपुरची राजकन्यका,
मुळीं न भ्याली ! भावां जनकां.
साक्ष ठेवुनी सूर्य, सुभद्रा,
हरुनी नेइल पार्था सुभद्रा,
नाथचि रचिती जिथे नाटका,
तिथे दूर कां मंगल घटिका !
( जाते.)

(यतिवेष धारण केलेला अर्जुन आसनावर ध्यानस्थ बसला आहे. सुभद्रा व कुसुमावती जवळ आहेत.)

*अर्जुन* : सच्चिदानंद जय, जगतादिकारण
नारायण, नारायण !
(सुभद्रा व दासी नमस्कार करतात.)

*अर्जुन* : अभिष्टवरप्राप्तिरस्तु.
स्वच्छंद येथला वात किती सुखकारी
ही काननशोभा आवडली मज भारी
वनवास यतीचा पौरजनाहुन रुचतो
भिंतीत कोंडता आत्मा त्यांचा पिचतो.
पंजरा सोडुनी मुक्त उडावा रावा
मी अनुभवितो गे, त्याच सुखप्रद भावा
आनंद दाटला चहू दिशांना आहे
आनंद अंतरी, कांतारातुन वाहे
तूं बोल सुभद्रे, वाहसि कां ग मौनी ?
स्वर मिळव तुझाही वन्य खगांच्या गानीं
(दासी जाते.)

*सुभद्रा* : विचारू कां एक, प्रश्न महाराज
एकांत सहज, सांपडला.
विचारीन त्याचा, राग न धरावा
हट्ट पुरवावा, अजाणाचा.

*अर्जुन* : सुखेनैव तूं विचार जे जे असेल तुझिया मनीं
तुझ्यासारख्या मुग्ध मुलीचा राग धरिल कां कुणी ?

*सुभद्रा* : (अगदी सावधपणे)
कां तरुण वयातच विरक्त आपण झाला
अनुभवावांचुनी प्रपंच का हो त्यजिला ?

*अर्जुन* : प्रपंच म्हणजे केवळ मृगजळ
तृषार्त आत्मा उरतो व्याकुळ !

*सुभद्रा* : सत्य आहे आपुली धारणा ही,
जन्मवेळीं हें कोणास कळत नाही.
जीवनाचा आस्वाद धुंद घेता—

व्यथा, वैफल्ये घेरती भूतजाता.
तसे काही का जाहले आपुलेही
उगिच संन्यासा घेईल कोण बाई !

*अर्जुन* : पूर्वचरितां सांगणे इष्ट नाही
तरिही तुजसी मी सांगतो कथा ही—
*माझि मातुल कन्यका रुपशीला*
*तिचा माझा बहु लोभ जुळुन गेला*
*मान्य पूर्वी मद्बंधु असुनि त्याला*
*पुढे नीचांनी वचनभंग केला*

*सुभद्रा* : मातुल कन्यका,
कशी ती वागली ?
भावांना भ्याली की,
प्रीतीस जागली ?

*अर्जुन* : काय मी सांगावी, सखीची थोरवी
गायकांनी गावी, कवींनी वर्णावी.
*माझ्यासाठीं तिने, अन्न वर्जियेले*
*रक्त शोषवीले, विरहाग्नीने*
*वेडी ठरवोनी, कोंडुनी ठेविले*
*ऐसे छळ केले, बंधुंनीही*
*परि तिने नाही, मन बदलीलें*
*निर्मळ राखिले, माझ्या ठायीं*

*सुभद्रा* : पुढें काय झाले ?
पुढें काय झालें ?
सांगावें सत्वरीं,
औत्सुक्य वाढलें.

*अर्जुन* : सुटला नाहीं सखिचा आग्रह
भावांचा ना हटे दुराग्रह
मीच शेवटीं विरक्त झालो
संन्यासाची वस्त्रें ल्यालो.

*सुभद्रा* : तंतोतंत अशी कथा यतिवरा, माझ्या घडे जीवनीं
आहे एकच भेद कीं विदुन मी झालें न संन्यासिनी

*अर्जुन* : साम्याचे स्थळ कोणते जुळतसे गोष्टीत या आणखी
*सुभद्रा* : माना ' मातुल–कन्यका 'च मजसी, शेषीं कथा सारखी.
*अर्जुन* : मम चरिताचा नायक तो मी
कोण मनाचा तुझिया स्वामी ?
*सुभद्रा* : *पांडुनृपति जनक जया*
*माता कुंती यदुतनया*
*धर्म भीम बांधव जया*
*नामें विजय जो.*
*अर्पियले या शरिरा*
*तया लोकधनुर्धरा*
*न फिरे जरि चराचरा*
*कंठ चिरियला.*
निश्चय झाला अटळ एकदा
द्या यतिदेवा, आशिर्वादा.
*अर्जुन* : निश्चयाच्या बळें, पावे नारायण
ठेवावी आपण, श्रद्धा पायीं.
*सुभद्रा* : ( स्वतःशीं )
ओळखिची देहाकृति वाटते मना
सांगतात नयन दोन, गूज लोचना
सांगितली आत्मकथा सुरस निजमुखे
दोघांचे चरित खचित एकसारखे
हृदयीं या म्हणुन उठे, सुखद कल्पना .
( उघड )
शांतविली जिज्ञासा एक यतिवरा,
माझ्यावर एक कृपा आणखी करा
*अर्जुन* : प्रिय शिष्ये, सांग तुझी काय कामना ?
*सुभद्रा* : गिरिगुंफांतुन मघा सहज हिंडता
सांपडला क्षात्रवेष, मज न धुंडता
अंगी हा चढवावा, हीच प्रार्थना.
देवाची मूर्ति कसा भक्त पूजितो
नविन नविन वेष तिचे तोच योजितो

द्यावे या वेषिं मला आज दर्शना.

अर्जुन : बालहट्ट की राजहट्ट हा ?

सुभद्रा : क्षात्रवेष हा लेउनी पहा !

अर्जुन : नारिहट्ट हा, वाटतो खरा.

सुभद्रा : पूर्ण तो करा, रुपसुंदरा !

( ती वेष अर्जुनाकडे देते अर्जुन कुंजाआड जातो. )

सुभद्रा : ( स्वतःशी )

*मन्नेत्र गुंतले, लुब्ध झाले, ज्यावरी असे, चित्तात सांचले*
*तेचि आले, बाहेरी तसे,*
*नरवर हे काय बाई ?*
*शुध्द मन हे, साक्ष देई*

( अर्जुन राजवेष लेऊन येतो. )

अर्जुन : नेसलो पहा हा तुला हवा तो वेष
या पुढे सुभद्रे, काय नवा आदेश ?

सुभद्रा : बेतल्यासारखा ठीक वेष हा झाला
हातांत हवा पण एक रेशमी शेला

अर्जुन : चालेल कां ही माझी भगवी छाटी ?

सुभद्रा : शेलाच आणते सुंदर तुमच्यासाठी.

( ती लगबगीने एक शेला आणून देते. )

अर्जुन : ( घडी उघडून पाहातो. )
चमत्कार हा कैसा झाला ?
कुठुन कसा हा आला शेला ?
'मातुलकन्या' चतुर प्रेयसी
कशी विसरली या शेल्यासी ?
सांग सुभद्रे, तूं तरि मजला

सुभद्रा : ( मान खाली घालून-लाजून )
आजवरी संशयात मजसि ठेविले
नाहीं का सोंग जुने अजुन संपले ?

अर्जुन : आवडिचा माझ्या मज तू, दिधलास शोभेने शेला
मीही घे देतो तुजसी, रत्नांची दुर्मिळ माला.

सुभद्रा : मूल्यवान ही साक्ष प्रीतीची

देणगि माझ्या प्राणपतीची
कळे न कांहीं बाई, मजसि
मिळवि कुठुन हा संन्याशी

*अर्जुन* : प्राणसंजीवनी, मदिय हृदय-स्वामिनी,
*भूमि, जल, तेज, पवमान, नभ, पांच*
*ही आदितत्त्वे करूनि साक्ष धरितो*
*पाणि तुझा सखे, वीर नर पार्थ हा,*
*धर्मकामीं तुला आज वरितो*
*प्रिये, सोडि सोडि, आता सशयाते,*
*देइ सखि गाढ आलिंगनाते*
( अलिंगन देतो )

*सुभद्रा* : संन्यास घेउनी का, आलात द्वारकेसी
सुचला न मार्ग काही, कैसा दुजा तुम्हासी ?

*अर्जुन* : तव सूचनेवरून, मी सोंग घेतले हे
ही पत्रिका पहाना, तव हस्तलेख आहे
( पत्र देतो )

*सुभद्रा* : अक्षर तर हे माझे दिसते
पत्र परी मी लिहिले नव्हते

*अर्जुन* : तुझ्यावाचुनी तुझेच अक्षर
लिहुनी गेला का गे ईश्वर ?

*श्रीकृष्ण* : ( प्रवेश करीत )
मीच होते ते पत्र सिद्ध केले
कळोनी आले दोघांस, ठीक झाले
पती भगिनीला इष्ट तो मिळावा
म्हणुन केला मी थोडका धिटावा

*सुभद्रा* : ( आवेगाने कृष्णाच्या पाया पडते. )
उपकृत तव कृष्णा, राहु आम्ही सदैव
तुजसम मज बंधू , केवढे हे सुदैव
( कृष्ण स्मितमुखाने आशीर्वाद देतो. )

*कृष्ण* : नको चिंता अल्पही करु गे तू ,
विजय देतो कार्यात शुद्ध हेतू.

ऐक पार्था, कळसास नाट्य जाई
हिला घेउनी तू संकेतस्थळी येई.
( जातो )
( बलराम उभा आहे. पडद्यामागून ओरडा ऐकू येत असतो. )

*पडद्यांत* : पळा धावा, पळा धावा, व्हा पुढें, जाउनि धरा '

*बलराम* : कशाचा ओरडा होतो,
कारणावाचुनी उगा ?
कोण रे तिकडे आहे,
जा, जरा जाउनी बघा.
( लंबकूर्च प्रवेश करतो )

*लंबकूर्च* : ( चाचरत )
स-- स-- स्वामी घडली दुःखद घटना !

*बलराम* : शतमूर्खा, ती स्पष्ट सांग ना.

*लंबकूर्च* : राजभगिनिसी संगे घेउन
दांभिक यति तो करी पलायन

*बलराम* : नगरदलातिल अवघे सैनिक कोठे गेले होते ?
दारी असती रक्षक की ती उभीं ठाकती प्रेते ?
रथ माझा आणा, कुणि त्या शोधा श्रीकृष्णा
*घालीन पालथी पृथ्वी, स्वर्ग पाहिन खालती*
*बघतो जातसे कोठे, दुष्ट चांडाळ तो यती !*
( श्रीकृष्ण येतो. )

*कृष्ण* : संताप कशाने अवचित इतका झाला ?

*बलराम* : घेऊन सुभद्रा, यती पळाला--गेला

*कृष्ण* : हें भविष्य मी तर पूर्वी केले होते
ऐकलें कुणी ना, मूर्ख ठरविलें मातें

*बलराम* : कारस्थान तुझे पुरे उमगले आहे मला चेटक्या,
माझा पाणउतार तू करविसी, योजुनिया नाटक्या,
आला वीट पुरा, मला न उरली आशा कशाची जगीं,
आता राज्य नको, प्रपंच नलगे, ही बंधने वाउगी.
जाया, बंधु, बहीण, आप्त, नुरले माझे जगी या कुणी,
जा रे घेउन या काषाय वसने, संन्यास घेतो झणी.

*चाकर* : ( आत येतो. गाठोड्यातील एक एक वस्तु रंगमंचावर मांडतो.)
छाटी, दंड कमंडलू, जपमणी साहित्य सारें असे.

*बलराम* : ( संतापातिशयानें )
कृष्णा, धन्य तुझी, तुझेच मज हें कर्तृत्व सारें दिसे.
जावे सत्वर मी निघुन म्हणुनी, केलीस तू सिद्धता
लज्जा नाहि कशी तुला तिळभरी, उच्छृंखला उद्धता.

*कृष्ण* : ऐकुन तरि घ्या त्याचे पुरते.

*बलराम* : तूच ऐक ते.

*कृष्ण* : नको बावरू सांग खरे ते सारें वनपाला
वेष यतिचा, कुठुनी कैसा, तुझ्याकडे आला ?

*लंबकूर्च* : संगे घेउन राजभगिनिला
दुष्ट यति तो पळुनी गेला
सेनापतिसह सारी सेना
शोधी त्याचा ठाव ठिकाणा
रैवतकातळीं एका ठायीं
गांठोडें हे हाती येई
सेनापतिंनी मज हे दिधले
मी आणुन ते इथे ठेवले
स्वये सात्यकी आता येतिल
चरणांपाशी सर्व सांगतिल.

*सात्यकी* : ( घाईने प्रवेश करीत )
रामकृष्णांचा विजय असो नित्य,
हर्षदायक मी आणिले एक वृत्त.

*बलराम* : ( वैतागाने )
बोल आता, सात्यके, बोल बापा,
नको वेड्या वाढवू मनस्तापा

*सात्यकी* : राजपुत्र कुणि तरुण सुंदर
अकस्मात ये रैवतकावर
यतीस गाठी, वाट आडवी
राजभगिनिते लढुन सोडवी
येती ती दोघे, दौडलो मीच पुढे वेगे

*बलराम* : राजपुत्र तो कोण कोठला ?
*सात्यकी* : दुर्योधनसा मला वाटला !
*बलराम* : तोच असो वा दुसरा कोणी, रक्षण-कर्ता झाला
वाचामनसा केली अर्पण भगिनी मी त्याला !
*कृष्ण* : विचार करुनी बोला दादा, वाङ्निश्चय झाला
पुनः सुभद्रा कशी काय हो देतां दुसऱ्याला ?
*बलराम* : राजपुत्र तो, तोच सुयोधन
नसला तर मी माझे पाहिन
दुर्योधन तर माझा चेला
समजाविन मी, सांगिन त्याला
जाई सात्यके, सत्वर जाई
त्या दोघांना घेउन येई
( सात्यकी दारापर्यंत जातो व परत येता येता म्हणतो– )
*सात्यकी* : नरवीरा यावें
द्वारकाधीशां भेटावे
*बलराम* : ( पुढे होऊन )
राजपुत्रा, तुझी कीर्ति मी ऐकली
भगिनी माझी तुला प्रीतीनें अर्पिली !
( अर्जुन येतो )
घात झाला पुरा, शब्द हो ओखरा
घातकी पार्थ हा, कुंतीचा कारटा
करिन या ठार मी, ही गदा फेकली
*गर्ग* : ( प्रवेशून )
गदा ठेव ती दूर यादवा, नको करू अविचार
निजभगिनिच्या सौभाग्यावर करिसि काय प्रहार ?
श्रीरामासम हे बलरामा, वचन दिलेलें पाळ
प्राणपणाने निज शब्दाचा करिति नृप प्रतिपाळ
*बलराम* : गुरुदेवा घ्या गदा हस्तकीं
घाला माझ्या क्षुब्ध मस्तकीं
नकळे कैसे काय जाहलें
माझ्यावरती विश्व उलटलें.

*गर्ग* : महाज्ञानी तू, होसि कसा वेडा
आप्तवाक्याचा विश्वास धरी थोडा
प्रसंगाचे औचित्य तरी जाण,
तुझे नाहीं होणार अकल्याण.

*बलराम* : ( शांत होत्साता )
प्राशन करितां गुरुवचनामृत,
शांत जाहले मस्तक विचलित.

*गर्ग* : योग्य आहे अर्जुन सुभद्रेस
तीहि आहे अतियोग्य अर्जुनासी.
दोन वंशाचे विख्यात जुने नाते,
जन्मजन्मीं तैसेच राहु दे ते.

*बलराम* : आज्ञा गुरुजनांची, मी मोडणार नाही.

*गर्ग* : आता वधूवरांचे, हातांत हात देई.
( बलराम तसे करू लागतो )

*बलराम* : *हा भगिनीचा कर तव करि धनंजया, घे दिधला.*

*अर्जुन* : *अत्यादरपूर्वक मी याचा स्वीकार पहा केला.*

*कृष्ण* : *नांदा सौख्यभरे,*
*शोभो कुल तव सत्कुमरें.*

( इत्यलम् )

१६९६९
REFBK-0016969